# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा दि. १९/१२/२००७

लालबहादुर शास्त्री स्थायी समिती
सभागृह, दुसरा मजला,
दि. १९/१२/२००७

आज दि. १९/१२/२००७ रोजी स्थायी समितीची सभा सुचना क्र. ०४ दि. १३/१२/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरिल विषयांवर विचार विनिमय करण्याकरिता लाल बहादुर शास्त्री, स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे सकाळी ११.०० आयोजित करण्यांत आलेली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ६) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ७) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| ८) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| ९) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| १०) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| ११) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १२) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १३) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| २) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ३) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

आजच्या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य,सदस्या,तसेच उपस्थित असलेले सर्व अधिकारी वर्ग, हरेश पाटील, नगरसचिव, मा. उपायुक्त साहेब, यांचे स्वागत करतो. व सचिवांनी सभेला सुरुवात करावी. अशी विनंती करतो.

( नगरसचिव यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)

( नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ११ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

कर विभागाच्या कामकाजाचा आढावा घेणेबाबत.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, दुसऱ्या सभेमध्ये इतिवृत्तांत मंजुरीसाठी आले होते त्यावेळी आपण चर्चा केली होती. व ते फेटाळल होते. त्याच्यानंतर इतिवृत्तांत मंजुरीसाठी आलेच नाही.

**मा. सभापती :-**

जानेवारी महिन्यामध्ये इतिवृत्तांत घेवु. पहिले ह्यांच्यामागे लागु. नंतर आपण इतिवृत्तांत कायम करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, आजच्या मिटींगमध्ये महत्वाचा विषय असा आहे की, कर आकारणी, जाहिरात ह्यांचा सगळा आपण आढावा होतो. त्याहुन महत्वाचा मुद्दा असा आहे की, भाईंदर मध्ये तीन महिन्यापुर्वी ३० एम.एल.डी पाणी डेली मिळणार होते. आणि मिळालेले आहे. त्याचे पोस्टर लागते मा. आमदारांचे पोस्टर लागते मा. खासदारांचे लागते, ह्यांनी पाणी आणले त्यांनी पाणी आणले आणि आज ते पाणी कुठे अडकलेले आहे? पाणी का येत नाही. त्याचे कारण काय आहे. पण प्रशासकिय कामकाजाच्या हजेरी मुळे ते पाणी शहरामध्ये येत नाही. तुम्हाला माहित असेल आता.

जानेवारी महिन्यामध्ये २० टक्के पाणी कपात होणार आहे. आणि आता, ८६ एम.एल.डी पाणी येते. त्याला ही लोक त्रस्त आहे. आणि २० टक्के पाणी कपात झाले.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य, ओमप्रकाश अग्रवालजी अपना जो विषय है ना २७ तारिख को पाणी का विषय है तभी बात किजिऐ। पहला जो विषय पत्रिकेने विषय रहता है। उसको ध्यान मे लेके बोलो

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, हा महत्वाचा विषय आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, मुख्य लेखाअधिकाऱ्यांना मी काल एक पत्र दिले होते. त्या एस्केलेशन प्राईजेसचे त्या बद्दल पण आपले थोडे डिस्कशन राहिले होते. तर त्याचे उत्तर काही मिळाले नाही. ते म्हणाले होते की, बघुन सांगतो एस्केलेशन अमाउंट काहीतरी ९५ लाखाची होती. त्याबद्दल काय झाले होते. त्याबद्दल मी काल एक पत्र दिले होते. त्याचे उत्तर ह्या लोकांनी सभागृहामध्ये द्यावे.

**मा. सभापती :-**

एक – दोन दिवसात ते तुम्हाला माहिती देतील.

**प्रशांत पालांडे :-**

मला पुर्ण डिटेल माहिती नको. पेमेंट दिले की नाही. एवढीच माहिती पाहिजे.

**श्रीकांत मोरे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते जे ९५ लाख रु. मध्ये आहे. ना ते एकत्र आहे की,

**प्रशांत पालांडे :-**

माझे म्हणणे काय आहे. की, ९५ लाख, ७५ हजार, ६४ रु. जे आहेत. मागच्या सभेमध्ये आम्ही विचारले होते की, एखाद्या तरी ठेकेदाराला दिलेले आहे की, नाही?

**श्रीकांत मोरे :-** एका ठेकेदाराला दिलेले आहे.

**शरद पाटील :-**

पेमेंट पुर्ण झाला की, एकाच ठेकेदाराला दिलेले आहे. त्याची सविस्तर माहिती द्याना.

**प्रशांत पालांडे :-**

त्यासाठी मी पत्र दिले होते.

**श्रीकांत मोरे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. की, ९५ लाखाचे जे पेमेंट आहे. त्याच्यामध्ये अनेक ठेकेदार आहेत. तर, त्या सर्वाचे पेमेंट झाले की नाही हे रेकॉर्ड बघुनच आपल्याला सांगतो.

**प्रशांत पालांडे :-**

मी सगळ्यांचे विचारलेले नाही. एखाद्याला आपण पेमेंट दिलेले आहे तर, साहेब ते नियमबाह्य नाही. इतिवृत्तांताला मंजुरी दिल्या शिवाय आपण पेमेंट कसे काय देवु शकता.

**श्रीकांत मोरे :-**

आमच्याकडे अकाउंट डिपार्टमेंटला जी एस्केलेशनची जी बिल आहेत. ती सर्व लेखा परिक्षण विभागाकडुन तपासुन आलेले आहे. आणि त्यांनी पेमेंट साठी पाठवलेले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, माझा तो प्रश्न नाही. माझा प्रश्न असा आहे. की, मिनिट्स किंवा इतिवृत्तांताला मंजुरी दिल्याशिवाय त्या ठरावाची अंमलबजावणी होते का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एकाने चुक करायची म्हणजे सर्वांनी चुक करायची का?

**नगरसचिव :-**

इतिवृत्तांताचा ठराव वाचुन कायम करण्यात आला तर पेमेंट करु शकतो. ठराव वाचुन कायम केले असेल तर? असे असते.

**प्रशांत पालांडे :-**

तसे झालेले नाही.

**शरद पाटील :-**

ठराव वाचुन झालाच नव्हता. सचिव साहेब जेव्हा आमची कुठची कामे असतात. तेव्हा ठराव होतो. तेव्हा तुम्ही सांगता की, इतिवृत्तांताला मंजुरी मिळालेली नाही म्हणुन करु शकत नही. आणि ह्यांना नियम वेगळे, आम्हाला नियम वेगळे असे कसे काय?

**नगरसचिव :-**

सभागृहात ठराव वाचुन कायम केला.

**शरद पाटील :-**

तरीसुध्दा इतिवृत्तांताला मंजुरी दिली नाही.ठराव वाचुन जरी कायम झाला. तरी सुध्दा आम्हाला अशी उत्तर भेटलेली आहे. की, इतिवृत्तांताला अजुन मंजुरी भेटली नाही. त्यामुळे आम्ही देवु शकत नाही. किंवा करु शकत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब त्याच्यामध्ये बायलॉजीचे नियम आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही सांगता ठराव वाचुन कायम करुन मग, पेमेंट देता येते. तर, कुठल्या नियमामध्ये आहे ते नियम आम्हाला वाचुन दाखवा. आता एखाद्या वेळीची उपविधी असते ती अजुन पर्यंत पेंन्डीग आहे. कधी सांगता की, उपविधी काय करु? शेवटी उपविधी प्रमाणे ह्या महापालिकेचे काम चालते. किंवा अजुन उपविधी मंजुर होण्याची वाट बघतात हे काय आहे? कधी कधी उपविधीचा आधार घेता विषय घेतो तर उपविधी मंजुर आहे तर काम करु शकतो. आणि कधी आहे. सांगता की उपविधी मंजुर नाही. तर काम करु शकत नाही. शेवटी उपविधीचा नियम काय आहे?

**नगरसचिव :-**

उपविधी जेव्हा आपल्या महानगरपालिकेने मंजुरी केली. त्यानंतर कामकाजाला सुरुवात करु शकतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृहात वेळोवेळी विषय आलेला आहे की, उपविधी शासनाकडे अजुन पेंन्डीग आहे. मग, त्यावेळेला तुम्ही कसे बोलता.

**नगरसचिव :-**

त्यांच्याकडे पेंडीग आहे तर ते त्यांच्या मंजुरीसाठी पेंडीग आहे. महापालिकेने मंजुर करुन पाठवलेले आहे तर मग कामकाजाला सुरुवात करु शकतो.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, बायलॉजीमध्ये काय आहे. ते वाचुन बघा ना. साहेब, बायलॉज मधली तरतुद बघा ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, महापालिकेच्या मा. महासभेमध्ये जेव्हा उपविधी वर चर्चा होते. त्यावेळेला तुम्ही उपविधीबद्दल बोलले की उपविधी बद्दल काय बोलले की, उपविधी मंजुरीला गेली पण मंजुर झालेली नाही. म्हणुन आम्ही काम करु शकत नाही.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. महापालिकेने जी निश्चीत केलेली उपविधी आहे. त्याप्रमाणे होते. सदरची उपविधी मंजुरी करिता शासनाकडे पाठवलेले आहे. आणि ते शासनाच्या विचाराधिन आहे. एखाद्या महापालिकेने निर्णय करुन शासनाकडे मंजुरीसाठी पाठवलेले आहे. म्हणजे ते नाकारते आहे असा त्याचा अर्थ होता नाही. म्हणुन त्याप्रमाणे काम करण्याची तरतुद आहे.

**प्रशांत पालांडे :-**

ठिक आहे. पण ह्या बाबतीत तरतुद काय आहे ते बघा ना.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तरतुद अशी आहे की, कोणताही ठराव स्थायी समितीमध्ये किंवा मा. महासभेमध्ये पारित झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करत असतांना तो ठराव होत असतांना त्या ठरावाची तातडी लक्षात घेता. किंवा अत्यावश्यक लक्षात घेत असता वाचुन कायम करण्यात येत असतो असे त्या ठिकाणी सर्वानुमते व्हायला पाहिजे आणि तसा तो ठराव सचिव कार्यालयाकडुन मा. आयुक्तांकडे आला तर, मा. आयुक्त साहेब इंमप्लीमेंटनसाठी विभाग प्रमुखाला देवु शकतात.

**प्रशांत पांलाडे :-**

तसे झाले का?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ऐकुन घ्या. पण मिरा भाईंदर महापालिकेमध्ये ठराव वाचुन कायम करण्यात आले. हे आता नव्याने सुरु केलेले होते. पण त्याच्यापुर्वी सचिव कार्यालयातुन जेवढे ठराव झालेले आहे. आणि त्या ठरावात काही आक्षेप नसेल तर ते ठराव मा. आयुक्तांकडुन विभाग कार्यालयाला अंमलबजावणीसाठी आलेले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे आक्षेप कोण घेणार?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

असेच आक्षेप होतात. जसे आता चर्चा इथे उद्‌भवली

**प्रशांत पालांडे :-**

आक्षेप आल्यानंतर कळेल ना की, आक्षेप आहे की नाही.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नियमाप्रमाणे कोणताही ठराव सचिव कार्यालयातुन मा. आयुक्तांकडे आल्यानंतर त्याची अमंलबजावणी करावी किंवा, नाही तसे त्या ठरावावर आयुक्तांना लिहुन विभाग कार्यालयाला पाठवायला पाहिजे विचलीत पध्दत अजुन पर्यंत मिरा भाईदर महापालिकेत चालु नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, हे जे वक्तव्य आहे ना तर मला ७ वर्ष झाले. मी कॉर्पोरेटेर आहे. असे नाही आम्ही काहीही राहिले तरी तुम्ही कायद्याप्रमाणे राहिले पाहिजे. पध्दत नाही म्हणजे काय? पण पध्दत असलीच पाहिजे. जर आम्ही एखाद महत्वाचे काम सांगितले तर ते लगेच सांगणार की, त्या ठरावावर इतिवृत्तांताला मंजुरी दिलेली नाही. मग ते कुठलेही असू दे सचिव साहेबांनी सांगितले ना आम्ही सर्टिफायची कॉपी जरी मागितली तरी तुम्हाला एका पानाची मिळत नाही. असे किती विषय आहेत. आणि तुम्ही पेमेंट जे सांगता मला माहित नाही. तुम्ही कोणाला दिले पण महापालिकेमध्ये ठरावीक एखाद्या राजकीय पक्षाच्या वतीने जे ठेकेदार आहेत त्यांची करोडोची टेंडर बिल पास होतात.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सचिव साहेब, हरी भाउ तुम्ही आता ह्याच्यात नोंद घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

नोदं घ्या म्हणजे काय? ठरावाला इतिवृत्तांताला मंजुरी न देता. पेमेंट कोणी केले? ते अधिकारी कोण आहे? त्या टिपण्या कोणी सादर केल्या ते सांगा? आणि पेमेंट कोणाला केले ते सांगा? त्यांची आम्हाला नावे कळु दे कोणत्या अधिकाऱ्यांनी रिकमेंड केले आणि तुम्ही जे म्हणता ना सचिवांनी मा. आयुक्तांकडे ठराव पाठवायचा ही नंतरची प्रोसेस सभागृहामध्ये इतिवृत्तांताला मंजुरी मिळाल्यानंतरचे ते कामकाज आहे इकडे काही वादळ आलेले नाही. आग लागलेली नाही की, कुठे आपत्ती आलेली नाही.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जी प्रोसिजर आहे ती मी आपल्याला सांगितली.

**मिलन म्हात्रे :-**

ते मला माहित आहे.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या मा. आयुक्त साहेब जबाबदार राहतील का तर इम्प्लीमेंटेशनला जातील तो ठराव विभाग प्रमुखाकडे गेला तर त्या विभाग प्रमुखाची काही चुक नाही.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे? तुमचा विभाग प्रमुख आम्हाला सरळ सांगतो की, इतिवृत्तांताला मंजुरी नाही आम्ही कामे करु शकत नाही.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रत्येक ठराव अमंलबजावणीसाठी प्रभाग कार्यालयाकडे जायला नाही पाहिजे. सचिव कार्यालयाकडुन यायचलाच नाही पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

ते तुम्ही तुमच्या आपसात सोडवायला पाहिजे आम्हाला काही घेणे – देणे नाही.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नाहीतर तुम्ही ठरवा काय आहे ते हे फॅक्ट आहे.

**प्रशांत पालांडे :-**

ह्या पर्टीक्युलर विषयावर तुमचे कॉमेंटस काय आहे?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी सांगितले ना विविध प्रोसिजर प्रमाणे कोणत्याही कामकाजाचे ठराव वाचुन कायम झाल्यानंतर त्याच्या अमंलबजावणीसाठी विभाग प्रमुखाकडे ते ठराव यायला पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे इतिवृत्तांत कायम झाल्यानंतर

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हो इतिवृत्तांत कायम झाल्यानंतर किंवा एखाद्या विषयाची आवश्यकता असल्यास आली तर ते वाचुन कायम करुन पुढचा ठराव सचिव कार्यालयातुन मा. आयुक्त कार्यालयाकडे आल्यानंतर मा. आयुक्त कार्यालय त्याच्यावर निर्णय घेईल त्या ठरावाची अमंलबजावणी .

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त कार्यालय असे बघत नाही का की ते इतिवृत्तांत मंजुर झालेले आहे की, नाही.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या बद्दल मा. आयुक्त साहेबांशी आपण चर्चा करु.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचा तो लुक आउट नाही. एकच आहे की,आत जे पेंमेट झाले हे इतिवृत्तांताला मंजुरी मिळालेली नसतांना झाले हे सत्य आहे ना?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे ठराव अंमलबजावणीसाठी विभाग कार्यालयाला आल्यानंतर विभाग कार्यालयाची ती जबाबदारी होत नाही. तुम्हाला अजुन ही विषय समजत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ते सोडुन द्या मी जे प्रश्न तुम्हाला विचारतो त्याचे उत्तर द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही आता बोलतात. की विशिष्ट काम असेल त्या ठरावाला इकडे नमुद केले असेल तर हा कुठला विशिष्ट ठराव आला.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

विभाग कार्यालयात जर अंमलबजावणी साठी पाठवता.

**एस.ए.खान :-**

मा. उपायुक्त साहेब पध्दत आणि नियम मध्ये काय फरक आहे.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी सांगितलेना नियममध्ये तरतुद आहे. ते ग्राह्य केल्यानंतर झाले पाहिजे. प्रॅक्टीकल जे ६ ते ७ वर्षाचे कामकाज झालेले आहे ना.

**प्रशांत पालांडे :-**

मग त्याला जबाबदार कोण?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याची जबाबदारी निश्चित होत नाही. त्याची प्रोसिजर करावी लागते ह्याच्यापुढे सर्व कामकाज पध्दतीने पाहिजे जबाबदारी निश्चीत होणार आहे जे काही नियम बाह्य झाले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही दोन गोष्टी सांगितल्या इतिवृत्तांत मंजुर होत नाही तो पर्यंत कार्यनिर्देश होत नाही. एका विशिष्ट कामांना ठराव वाचुन कायम करुन कामाची प्रोसिजर सुरु करायची तर ह्या विषयापुर्ती तुम्ही असे सांगणार की, विशिष्ट काम होते काय?

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मला काय म्हणायचे आहे की, तुम्ही विशिष्ट विषयापुर्ती चर्चा करता ऑल धोरणाबद्दल चर्चा व्हायला पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, धोरणात्मक बोलतो ना.

**शरद पाटील :-**

धोरणात्मक चर्चा आहे तर बरोबर आहे ना पण प्रत्येक गोष्टीचा नियम एकच लागतो ना.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी काय म्हणतो की, एस्केलेशन विषया पुरती कारवाई झाली. आपली अशी धारणा आहे का? मी म्हणतो की, महापालिकेचे ५ वर्षाचे कामकाज एक्सेशन पध्दतीने झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणुन आपण आता पुढे असेच करायचे का? आम्ही तर पाच वर्षे झाले हेच बघतो. महत्वाचे काम नेले तर इविवृत्तांत आम्हाला देत नाही. कामे पण करत नाही. म्हणुन सांगतो की, आता जे हे पेमेंट झाले. आजच्या मिटींगमध्ये हा विषय विषय निघाला ते पेमेंट कोणी काढले. त्याला टिपण्या कोणी सादर केल्या? इतिवृत्तांताला मंजुरी नसतांना त्या अधिकाऱ्याचे नाव ज्या ठेकेदाराला पेमेंट केले ते किती आहेत ते आणि त्याची नावे ते मला आता पटलावर पाहिजे नाहीतर आम्ही मिटींग चालु देणार नाही. तर तुम्ही डिक्लेर करा.

**मा. सभापती :-**

बेलवटे आपण केलेले आहे.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याच्यावर बेलवटे व्यक्ती म्हणुन जबाबदार राहत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाने सांगावे ना.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी माझे कॉमेंटस सांगतो तुम्ही ते मिनिटला द्या एखादा ठराव होवुन आयुक्त कार्यालयाकडुन विभाग कार्यालयाकडे अमंलबजावणी साठी आला तर विभाग प्रमुख त्याला जबाबदार होवु शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त कार्यालयाकडे पाठवणारा तो अधिकारी कोण आहे. आमचे ऑब्जेक्शन ते आहे. इतिवृत्तांताला मंजुरी नसेल तर पाठवले कोणी? तुम्ही असे बोलता ना इतिवृत्तांताचे कोणी बोलत नही बाकीच्या कामासाठी तुम्ही आम्हाला इतिवृत्तांतमंजुर नाही असे गोष्टी शिकवता तर हे गेले कसे काय? तो अधिकारी आम्हाला पाहिजे.

**मा. सभापती :-**

बेलवटे साहेब, सांगतात की, ते बनसोडे साहेबांच्या टाईमला झालेले आहे. तर त्यांना काही कल्पना नाही.

**मिलन म्हात्रे :-**

बनसोडे साहेब असे पाठवु शकत नाही. त्या डिपार्टमेंटमध्ये सगळी टिपणी येते बनसोडे साहेबांचा शेवटची सही आहे त्याच्यानंतर मा. आयुक्ताची होते ह्यांनी आम्हाला सांगायचे की, काम कसे आहे. आम्ही सुध्दा एवढी वर्षे कामे केलेली आहे.

**मा. सभापती :-**

मोरे साहेबांना विचारतो त्यांना माहित पडेल कोणी केले.

**मिलन म्हात्रे :-**

ठेकेदार कोण आहे. त्यांची नावे सांगा?

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, त्यासाठी आगोदर मी पत्र दिलेले आहे. की, थोडीशी माहिती आम्हाला सभागृहात मिळावी कारण ह्या विषयावर आपली चर्चा झाली होती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

हे पेमेंट आज केलेले नाही. पेमेंट कधीच झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमचे ते पत्र आहे. प्रशासकिय कालावधी मध्ये असे पेमेंट झालेले आहे. त्याची माहिती द्या.

**मा. सभापती :-**

कमिशनर १० लाख रू. पर्यंत पेमेंट कधी ही करू शकतो.

**प्रशांत पालांडे :-**

हे १० लाख रू. चे नाही. हे वेगळे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा विषय वेगळा आहे. हा विषय १० लाख रू. चा नाही. वाढीव झालेली रक्कम आहे. मा. आयुक्तांनी १० लाख रू. करावे ना. कोणी नाही म्हटलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या मिटींगमध्ये मा. सभापती साहेबांचे वक्तव्य आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, आम्ही प्रशासनाचा ह्याच्यासाठी बोलतो की, एखाद्या नागरिकांच्या हिताचे काम असेल तर काय बोलतात की, ठरावाला मंजुरी मिळालेली नाही. इतिवृत्तांताला मंजुरी मिळालेली नाही. तर आम्ही करणार नाही आणि हे कामे इतिवृत्तांत मंजुरी होण्याच्या आधी करतात. मग ते तुम्ही का करता?

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, बायलॉजमध्ये तरतुद आहे. तर ती अत्यावश्यक असेल तरच तरतुद आहे. तर ही काय थोडी अत्यावश्यक बाब आहे.

**मा. सभापती :-**

अत्यावश्यक सवाल नाही. त्यासाठी आम्ही इतिवृत्तांत मंजुर केले नव्हते. पेमेंट कसे झाले? ते मोरे यांनी सांगावे. कोणी केलेले आहे? कोणाला केलेले आहे? कुठल्या कॉन्ट्रॅक्टरला केलेले आहे. ते सगळ आम्हाला कळावे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ते सगळ्यांना माहित आहे. एखाद्या नगरसेवकाला किंवा कोणाला अडवायचे असेल तर तो नियम तुम्ही बरोबर दाखवता. सगळ्यांना सगळ माहिती आहे. तुम्ही प्रोसिडींगमध्ये बघा ह्या अगोदरच्या स्टँडींग मध्ये किती वेळा आलेले आहे. तुम्ही आता बसलेले आहेत. शिवमुर्ती नाईक साहेब असताना आमचे वाद आहेत. मागची प्रोसिडींग काढा आणि बघा.

**श्रीकांत मोरे :-**

अकाउन्ट विभागाला लेखा परिक्षण विभागातुन ते एक्सेलेशनची जी बिल आहेत ना. ती सर्व तपासुन पाच पाच पेमेंट साठी आलेली आहेत. त्यानुसार पेमेंट केलेले आहे. हे ९५ लाख रू. ची जी बिल आहेत ती अनेक......

**प्रशांत पालांडे :-**

आम्ही पर्टीक्युलर कुठल्या विभागावर किंवा कोणावर टिका करत नाही. आमचा मुद्दा धोरणात्मक आहे की, इतिवृत्तांताला मंजुरी दिल्याशिवाय तुम्ही एस्कलेशनचे पेमेंट कसे केले. मोरे साहेबांची चुक आहे किंवा आणखिन कोणाची आहे असे आम्ही कुठे बोलतो.

**मिलन म्हात्रे :-**

ज्याची चुक आहे त्याला आम्ही बोलणार सुद्धा ज्याची चुक आहे तर असे ही होत नाही की, आम्ही त्याचे नाव घेत नाही. आम्ही त्याची नावे घेणार नाही आणि तक्रार ही करणार. तुम्ही आम्हाला जर पॉईंटवर मुद्दे ठेवून तुम्ही आम्हाला कायदा दाखवत असाल तर तुम्हाला सुद्धा कायदा दाखवता येतो. तुम्ही आमची कामे करत नाही. आम्हाला सर्टीफायची कॉपी मिळत नाही. कामे तर सोडा. इतिवृत्तांताची आम्हाला सर्टीफायची कॉपी मिळत नाही. या मा. महासभेला ५ मिर्टीगचे दिले. म्हणजे आपण पाच महिन्या अगोदर दहा महिन्या अगोदरचे इतिवृत्तांत आता मंजुरीला दिले.

**एस. ए. खान :-**

इतिवृत्तांत मंजुर झालेले नाही. तर पेमेंट कसे काढता? आम्हाला जेव्हा इतिवृत्तांत पाहिजे होते तेव्हा सांगितले की, इतिवृत्तांत मंजुर झालेले नाही. तर तुम्हाला कॉपी देता येत नाही. हे चुकीचे आहे ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांना मा. सभापती साहेबांच्या माध्यमातून सांगू इच्छितो की, प्रशासनाकडून सर्टीफाय कॉपी बद्दल आपल्याला काही जे आक्षेप आलेले आहे. ती वस्तुस्थिती आहे. ज्यावेळी सर्वानुमते कामकाज होते. तेव्हा कोणत्याच प्रकारचा इश्यु होत नव्हता. त्यावेळी सर्टीफाय कॉपी द्यायला कोणी ऐतराज केलेला नाही. आजच्या परिस्थितीत कामकाज होत असताना कोणत्याही बाबी फार बारकाईने तपासुन पाहत चाललेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आपण असे बोलू नका. तुम्ही वाटेल ते कराल ते कसे चालेल. तुमच्या म्हणण्यात असे आहे की, आता जी काय राजकिय परिस्थिती आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रश्नच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

असे नाही. तुम्ही तो रंग देवू नका याचा अर्थ असा नाही की, आम्ही तुमच्या पुर्वीच्या भानगडी झाकल्या गेल्या. तुम्ही असे बोलायचे नाही. तुम्ही वाटेल तसे बोलू नका नियमाचे बोला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्या महासभेच्या कोणत्याही सर्टीफाय कॉपी मिळायला अडचण आली तर खुल्या मताने येथे चर्चा व्हावी.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी कोर्टामध्ये गेलेलो आहे. ज्यावेळेला कोर्टामध्ये जायची पाळी आली ना त्यावेळेला सचिवांनी वेळोवेळी सांगितले की, इतिवृत्तांताला मंजुरी मिळाली नाही म्हणून देता येणार नाही. इतिवृत्तांताला मंजुरी मिळाल्यानंतर मला मिळालेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यावेळेला सर्व कॉपी केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्याकडे जेवढया कॉप्या आहेत. तुम्ही सर्टीफाय कॉपी नंतर दिलेली आहे. इतिवृत्तांताची मंजुरी पहिली मिळालेली आहे. माझे ॲप्लीकेशन तुम्ही दोन - दोन महिने पेंडींग ठेवलेले आहे आणि राजकीय यांच्याबद्दल बोलू नये.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा नामकरणाचा प्रस्ताव आला.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. आता, अधिकाऱ्याला सांगतो स्टँडींगच्या नगरसेवकांना कुठल्याही कॉप्या मिळाल्या नाही. तर, सभापतीकडे तक्रार करण्यात यावी.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, कॉपीचा विषय नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तो विषय संपला. आता, ९५ लाख रू. चे बोला. आम्ही त्या अधिकाऱ्याचे नाव डिक्लेअर करायला सांगितले आहे. त्यांनी सांगितले अनेक दिले म्हणजे आम्हाला लिस्ट पाहिजे. त्याच्यामध्ये कोण आहे? ९५ लाख रू. म्हणजे १ करोड रू. झाले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही इतिवृत्तांत कधी सादर करणार.

**प्रशांत पालांडे :-**

मला वाटते त्याच्यामध्ये निवडणूका लागल्या. म्हणजे आचार संहिता लागते. आपण त्यावेळी नागरीकांची कामे थांबवतो. तर एवढ काय अर्जंट काम होते की फटाफट केले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कसे त्याचे पेमेंट निघाले हे बघावे लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

आणि ह्याची माहिती सुद्धा दिलेली नाही. माहितीच्या अधिकारात तुम्हाला पत्र दिले. धोरणात्मक निर्णय खर्च केले ते माहिती आलेली नाही. तुमच्याकडेच चालवायला अपिल येणार आहे.

**मा. सभापती :-**

मोरे यांना जी माहिती पाहिजे असेल ती त्यांना दोन दिवसात माहिती द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृहात आणा. हे ९५ लाख रू. झालेले आहे.....

**मा. सभापती :-**

पुढच्या वेळेला सभागृहात आणा.

**मिलन म्हात्रे :-**

जो फिगर आहे तो सर्व चला मिटींग सुरू करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, मागे थकबाकीचा विषय निघाला होता. आज हे आकडे दिलेले आहे. ह्या आकड्यामध्ये आपण प्रभाग समिती क्र. ०४ आणि ०३ ही दोन्ही बघीतले. त्या दोन्ही मध्ये मागिल थकबाकी होती प्रभाग समितीमध्ये ८,३५,०००/- रू. आणि प्रभाग समिती मध्ये ८ कोटी रू आणि मागील चार प्रभागामध्ये १३ कोटी ह्या दोघांची जी मागिल बाकी आहे. त्यामध्ये त्यावेळी विषय निघाला की, छौट्या सोसायटीने पैसे भरले नाही. तर कनेक्शन कापायचे. मग १३ कोटी रू. आणि ८ कोटी रू. मध्ये कोण कोण मोठी लोक आहेत. याची यादी आहे का?

**अजित पाटील :-**

प्रभाग क्षेत्रामधली सगळे थकबाकीची यादी आहे. डिटेल यादी ही असते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझ्या माहितीप्रमाणे एका बिल्डरचे ३० ते ४० लाख रु. बाकी आहे. म्हणून मी काय बोललो. १३ कोटी रु.मध्ये एकाचे जरी नाव असेल. की सर्व जर दोन हजाराचे बाकी आहे. एखादा असा विषय आलेला आहे. १३ कोटी रु. मध्ये की ही मोठी रक्कम ४० लाख रु. बाकी आहे. असे नाही. तर आहे का? सर्वांचे फक्त. १००, २००, ५०० रु. बाकी आहे का? म्हणून एवढी मोठी रक्कम झाली का?

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या मिटींगमध्ये ठरलेले होते ना की मोठे थकबाकीदार कोण आहे? आपण पेपरमध्ये ॲड काढल्या. ज्यांच्या मालमत्ता जप्त केल्या नाही. त्यांची माहिती आपण या मिटींगमध्ये देणार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा माहितीचं नसेल परत हा विषय आणायची गरज काय आहे?

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब आमचा एवढा वेळ फुकट नाही. आम्ही मिटींगला येणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

शेवटी हे प्रशासनाचे काम आहे. वसूली करायचे काय आमचे नाही. आपले उत्पन्न वाढले पाहिजे. प्रशासन कुठेतरी काम करतो. त्याला चालना यावी म्हणून आपण गांर्भीयाने काम करतो. नाहीतर प्रत्येक वेळी जकातचा. आढावा घ्यायचा..

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या माहितीनुसार पुढच्या वर्षी जवळ जवळ ४५ करोड रु. चा आपल्याला जकाताचा डेफिसेशन बसणार आहे. तुम्ही हवेत राहू नका. जकात गेली तर तुमच्या लोकांची हालत खराब होईल आणि तुम्ही त्या ह्याच्यात स्वप्नात रहाल. तर स्वप्न भंग झाल्याशिवाय राहणार नाही. नुकसानीला भागीदार कोणी नसते. आता सगळ्या खर्चाला आवरते घ्या. गाडया, घोडे सगळे बंद करा. जे असेल ते करतील. कोणाला काय करायचे ते सेंट्रल गर्व्हमेंट चे ऑफीसर ट्रेनमध्ये जातात येतात. त्यांना रेल्वे देत नाही. गाडी भाडे एक्सपेन्स वगैरे असते. आता आवर नाही घेतले तर आपल्याला पुढे त्रासदायक होणार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब अजूनही सांगतो मागच्या पेपरची ॲड बघून त्यांना वसूली करायला सांगा. त्यांना माणसं द्या.

**मिलन म्हात्रे :-**

आपण गेल्या वेळेला रुलिंग दिले होते की, दुसऱ्या मिटींगला पेपरमध्ये जाहिरात दिले. त्याचे शेडयूल ते लोक आपल्याला देणार आहे ते कुठे गेले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांना सांगा की, १३ कोटी रु. ची वसूली करुन द्या. पाहिजे तर त्यांना एक महिना अजून द्याना.

**मिलन म्हात्रे :-**

एक महिना देवून चालत नाही. आपल्याला जानेवारीमध्ये फायनल बजेटमध्ये बसायचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता वसूली केलेली नाही. फक्त फिगर दिलेले आहे आपण काय प्रत्येक वेळी वेगळे समिकरण बसवायचे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्याच्यासाठी बोलला होता ना की, ५६ नुसार कारवाई करायला घ्या. पगार कापून काहीही होत नाही. तुमचे जे ऑर्डर आहे रुलिंग आहे. त्यालाही कोणी किंमत देत नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, त्या लोकांनी कारवाई चालू केलेली आहे. वसूली चालू केलेली आहे. त्याप्रमाणे आपल्याला

**मिलन म्हात्रे :-**

आतापर्यंत वसूली किती झाले?

**मा. सभापती :-**

चार दिवसात किती वसूली करु शकता पाचव्या दिवशी आपली मिटींग लागलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरारोडमध्ये एका थकदाराची बाकी ३५ ते ४० लाख रु. बाकी नाही का? ह्यांच्या रेकॉर्डमध्ये नाही का?

**अजित पाटील :-**

मिरारोडची एकंदरीत थकबाकी दाखवलेली आहे. १३ कोटी रु. त्यामध्ये संपूर्ण मिरारोड भागाचा सर्व्हे डिटेल मध्ये नाही. मोठी थकबाकी कमी आहे. ती आम्ही काढलेली आहे. त्याच्यामध्ये दोन तीन थकबाकी अशी आहे. की त्यांची जवळ जवळ ७ लाख रु. ची थकबाकी आहे. त्याची लिस्ट प्रभाग अधिका-याने आता माझ्याकडे परवाच दिलेली आहे. त्याचे पाणी कनेक्शन कापण्याबद्दल आमच्या प्रभाग अधिका-यांनी सजेस्ट केले होते. त्यामध्ये पाणी कनेक्शन कापण्याचे आदेश साहेबांनी दिलेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पाण्याचे कनेक्शन कापता आणि बिल्डरचे कनेक्शन कापत नाही.

**अजित पाटील :-**

१३ कोटी रु. मध्ये संपूर्ण मिरा भाईंदर चेना ते उत्तन पर्यंतचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दोन लिस्ट तयार करायच्या होत्या. एक वर्तमान पत्रात तुम्ही जप्तीची जी काही नोटीस काढली होती त्याच्या आपण ५ लाख रु. पासून लमसम सुरु करु. अशी जी लिस्ट द्या ना. म्हणजे वाद होणार नाही. जर आपल्याकडे स्टेट स्ट्रीक दाखवता...

**शरद पाटील :-**

साहेब ७ लाख रु. एकाचे बाकी आहेत. तर तुम्ही त्याचे कनेक्शन कापायला ऑर्डर मागता आणि एखाद्या सोसायटीचे पाच हजार रु. बाकी आहे. त्याचे तुम्ही कनेक्शन कापून येता म्हणजे हा नियम कुठे लागतो. ते सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एखाद्या सोसायटीचे थकबाकी असेल तर ते बिल्डर चे बाकी आहे. मी बोलतो ना. बिल्डरचे २० ते २२ लाख रु. बाकी आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपले पैसे बाकी आहे तर त्याच्यावर ॲक्शन घ्यायला काय हरकत आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, आमच्या प्रभागात दोन-दोन, तीन-तीन हजार रु. बाकी आहे तर त्यांचे कनेक्शन कापून आले. म्हणजे ती लोक नगरसेवकाकडे आले आणि ७-७ लाख रु. बाकी आहे त्यांचे अजून ऑर्डर घ्यायचे आहेत? कनेक्शन कापायला.

**अजित पाटील :-**

प्रभाग अधिका-यांचा रिपोर्ट परवा दिवशी आलेला आहे. तर काल त्यांची ऑर्डर झालेली आहेत. दोन दिवसात त्यांचे कनेक्शन कापू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, त्या बिल्डर चे नविन बांधकाम थांबवा ना. पाणी कनेक्शन कापून काही होणार नाही तर तुम्ही त्या बिल्डरचे नविन बांधकाम थांबवा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

बरोबर आहे तसे करा.

**मा. सभापती :-**

बिल्डर कोण आहे ते आपल्याला कसे माहिती?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब ह्यांना माहिती असेल ना.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

कोणीही असू द्या.

**अजित पाटील :-**

आर. एन. ए. बिल्डर चे आलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आर. एन. ए. बिल्डरचे सर्व बांधकाम थांबवा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

इकडे बरोबर प्लॉनिंग व्हायचा आधी तिकडे पटापर सेक्शन होतात. म्हणजे ह्यांचे आणि त्याचे कॉर्डीनेशन आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्या बिल्डरचे सगळे बांधकाम थांबवा.

**अजित पाटील :-**

त्याचे कनेक्शन आम्ही दोन दिवसांत तोडू.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

त्यांचे मेन ऑफीस जिथे असते तिथे कारवाई करा ना. त्यांच्या इतर प्रॉपर्टीवर सुद्धा आपल्याला...

**एस. ए. खान :-**

डी.टी.पी. वाल्याला बोलवा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

प्लॉनिंग आहे तर सोसायटीचे कापणार नाही ना.

**एस. ए. खान :-**

नाही.

**अजित पाटील :-**

आताच सोसायटी केले. तिथे बिल्डर टाउन मध्ये बिल्डींग आहे. त्योच दोन वर्षाचे टॅक्स चे ६० लाख रु. बाकी आहे. कालच प्रभाग अधिकाऱ्यांकडून रिपोर्ट आलेला आहे. कापण्याचे आदेश साहेबांनी काल दिलेले आहे. तर आम्ही दोन दिवसात कनेक्शन कापून टाकू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अजित पाटील साहेब त्याचे एवढे पैसे बाकी आहे मग त्याच्या नळ कनेक्शन मंजूर कसे झाले? आणि मग तुम्ही त्यांचे गेल्या वर्षी नळ कनेक्शन का कापले नाही?

**अजित पाटील :-**

त्यांनी गेल्या वर्षी कर आकारणी केली. गेल्या वर्षीचे ३० लाख रु. आणि ह्या वेळेचे ३० लाख रु. असे टोटल ६० लाख रु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे एका वर्षाचे ३० लाख रु.

**मिलन म्हात्रे :-**

एकूण कनेक्शन किती आहेत?

**अजित पाटील :-**

कनेक्शनची माहिती आमच्याकडे नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग एखाद्या झोपडपट्टी वाल्यांचे टॅक्स बघता.

**एस. ए. खान :-**

दोन चार कॉम्प्लेक्स असतील ना.

**शानू गोहिल :-**

मग त्यांचे कनेक्शन कसे पास झाले?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, हा विषय पुन्हा इकडे थांबवा. तुम्ळी ह्याला अजून १५ दिवसाची मुदत द्या. थकबाकी वसूल करायला डिसेंबर एन्ड पर्यंत द्या. आपण फूकट चर्चा करायची हे बरं नाही. आपण सगळे बिझनेस मेन आहोत. दोन दोन तास चर्चा करायची आणि रिझल्ट झिरो आहे.

**मा. सभापती :-**

मध्ये आपण सांगितले की त्यांच्यावर सक्त कारवाई करु तर त्याच्यावर सक्त कारवाई करा किंवा आपण त्याचे ऑफीस लिलाव करु या.

**शरद पाटील :-**

साहेब आम्हांला ह्याच्या पुढची पण माहिती पाहिजे जर त्यांचे ६० लाख रु. बाकी आहे.

**सुनिता पाटील :-**

साहेब एखादा व्यक्ती रुममध्ये राहतो. त्याच्या रुमचे १५००/- रु. टॅक्स आला असेल तर त्याला सांगण्यात आले की, तुझ्या घरावर जप्ती आणणार आणि ज्यांचे ६० लाख रु. बाकी आहे. त्यांना काहीच नाही. तर तुम्ही त्यांच्यावर कसली कारवाई करणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब तो सर्व घेतो. मेन्टेनन्स घेतो.

**शरद पाटील :-**

साहेब ती त्याची जबाबदारी आहे ना. मा. सभापती साहेब आम्हांला त्याच्यावर आणखिन उत्तर पाहिजे. त्यांचे जर ६० लाख रु. बाकी आहे. तर त्यांच्या दुसऱ्या बिल्डींगला पाण्याचे कनेक्शन दिलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

मा. सभापती निर्देश दिल्याप्रमाणे दरवर्षी कारवाई करा. १००टक्के वसूल करा आणि त्याचा अहवाल द्या.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही कनेक्शन कापा पण मला आणखिन एक माहिती पाहिजे. ज्याचे ६० लाख रु. बाकी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते रेकॉर्डला द्या.

**मा. सभापती :-**

त्या बिल्डर वरती ज्यांची थकबाकी ६० लाख रु. वरती आहे. तर ती या ७ दिवसात वसूली केली नाही तर त्याच्यावर लिलावाची कारवाई करावी पाणी कनेक्शन सोडून त्याच्यावर लिलावाची कारवाई करावी. त्याच्या अतिरिक्त जागेवर.

**शरद पाटील :-**

साहेब, हे ६० लाख रु. ज्या बिल्डरचे बाकी आहेत तर त्या बिल्डरला आणखिन दुसऱ्या नविन बांधकाम कनेक्शन दिलेले आहे का? त्याची माहिती आम्हांला पाहिजे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मागच्या वर्षी सुद्धा रवि ग्रुपचे असे पैसे बाकी होते.

**एस. ए. खान :-**

रवि ग्रुपचे पण पैसे बाकी आहेना. त्यांनी पण बंगला बांधलेला आहे त्याचे पैसे अजून भरलेले नाही.

**शानू गोहिल :-**

अजित पाटील साहेब, मिरा भाईंदर क्षेत्र में ऐसा कौन कौन सा एरिया जहा से ज्यादा से ज्यादा टॅक्स आना चाहिए। उसके बारेमें आप नगरसेवकोंको भी थोडासा बताइए ना. तो हम भी हमारे एरिया में आपको हेल्प करेंगे। हमे मालूम तो होना चाहिए की हमारे एरिया मे बाकी है।

**मिलन म्हात्रे :-**

हे ६० लाख रु. चे झाले. आणखिन मोठे फिगर आहे का?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेबांनी सांगितले की रवि ग्रुप सुद्धा पैसे बाकी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

किती बाकी आहे ते बोला? फिगर द्या.

**एस. ए. खान :-**

८० लाख रु. बाकी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब खरं आहे का?

**अजित पाटील :-**

मी प्रभाग अधिकाऱ्याकडून माहिती मागवतो.

**मा. सभापती :-**

अजित पाटील तुम्हांला मी सांगतो की मला काही कल्पना नाही. दुसऱ्या मिटींगमध्ये २७ तारखेपर्यंत तुमच्याकडे कार्यवाही काय झाली. ह्याचे माझ्याकडे समिकरण आले पाहिजे. उद्या जाहिरात द्या. पेपरला नोटीस काढा. त्यांनी जर चार दिवसात भरले नाही. तर त्यांच्या ऑफीसवर लिलाव करा अशी एक नोटीस काढून टाका.

**एस. ए. खान :-**

त्यांच्या ऑफीससमोर ढोल वाजवा.

**अजित पाटील :-**

आठ दिवस अगोदर सगळ्या सोसायटींना नोटीस दिलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**
काय करण्याकरिता?
**अजित पाटील :-**
आठ दिवसाचा अहवाल द्यायला सांगितला ना.
**मिलन म्हात्रे :-**
त्यांनी जर नाही दिले तर तुम्ही काय करणार?
**अजित पाटील :-**
नाही दिले तर ॲक्शन घेवू.
**मिलन म्हात्रे :-**
ॲक्शन काय घेणार?
**अजित पाटील :-**
पाणी कनेक्शन कापणार.
**एस. ए. खान :-**
मा. सभापती साहेब आम नागरिकांना ते एवढे हैराण करतात.
**मा. सभापती :-**
लिलाव करताना काय करणार?
**अजित पाटील :-**
लिलाव करताना प्रोसिजर करावी लागेल.
**मिलन म्हात्रे :-**
प्रोसिजर निराळी होतील.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
मा. सभापती साहेब त्या बिल्डरचा टॅक्स बाकी आहे. तर पाणी कनेक्शन कापून त्या बिल्डिंगच्या लोकांना तुम्ही हैराण कशाला करता? तुम्ही त्याची प्रॉपर्टी सिल करा. लिलाव करा. बाकीचे बांधकाम थांबवा.
**अजित पाटील :-**
त्याच्यामुळे ६०टक्के बिल्डर ऑक्यूपाय आहे.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
बरोबर आहे. तुम्ही पाणी कनेक्शन कापणार. तिथे परत वाद निर्माण होणार. कारण तो जो फ्लॅट घेतलेला आहे. तो फ्लॅट घेतलेला आहे. त्या फ्लॅट घ्यायच्या अगोदर त्या बिल्डरचे पैसे बाकी असतील तर तो फ्लॅटधारक कसा काय भरेल?
**मिलन म्हात्रे :-**
टँकरवर टाकतील.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
मग तुम्ही लोकांना कशाला हैराण करता. त्या ऐवजी तुम्ही बिल्डरचे काम थांबवा. त्याची प्रॉपर्टी लिलाव करा ना.
**एस. ए. खान :-**
त्याच्या फ्लॅटला सिल लावा ना.
**मिलन म्हात्रे :-**
मा. सभापती साहेब तुमच्या पाच बिल्डींग आहे. त्या अलग अलग चाललेल्या आहेत. एका बिल्डिंग ची थकबाकी आहे. त्याच्यावर तुम्ही इंडीव्हीजअली कारवाई करु शकता. बाकीच्या प्रपोजल वर काही करु शकत नाही. हा नियम आणि कायदा आहे. त्याकरिता ते टँकर टाकतील काय करायचे ते करतील. ते फ्लॅट घेणाऱ्याचे पैसे आहे ना.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**
सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात तरतुद अशी आहे. एखादा आपला खातेदार किंवा मालक असेल जो टॅक्स पेअर आपला आहे तो टॅक्स देत नसेल. मिरा भाईंदरच्या हद्दीतच काय महाराष्ट्रात किंवा इंडियात कुठे प्रॉपर्टी असेल त्याच्यावर कारवाई करता येईल. त्याची जप्ती नोटीस काढून तिथल्या...
**मिलन म्हात्रे :-**
साहेब हे सगळं खरं आहे. तुम्ही बोलता हे बरोबर आहे. पण हे ८० लाख रु. राहतात कसे? आता तेच उत्तर तुम्ही आम्हांला द्या.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**
करता येत नाही म्हणून मी सांगतो करता येते.
**ज्योत्स्ना हसनाळे :-**
साहेब करता येत ना तर मग का करत नाही.

**एस. ए. खान :-**

साहेब आमच्या येथे शांती स्टार बिल्डर आहे. त्यांनी विशेष स्वच्छता कर लावलेला आहे. आपल्या महानगरपालिकेने लावलेला आहे आणि त्यांनी पण घेतलेला आहे. त्याच्याबद्दल जरा खुलासा करा. त्या लोकांची तक्रार आलेली आहे की त्या लोकांनी भरलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

मा. आयुक्त साहेबांशी त्याच्यावर सविस्तर चर्चा झाली. ज्या तारखेला महापालिका लावलेला आहे. त्याच्या पूर्वीचे टॅक्स त्यांनी वसूल केलेले आहे.

**एस. ए. खान :-**

माझ्या म्हणण्याचे उद्देश हेच आहे की, आम नागरिकांना आपण हैराण करतो आणि बिल्डर चे टॅक्स बाकी आहे...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

ज्यावेळी महापालिका हस्तांतरीत झाली तेव्हा महापालिका वसूली...

**एस. ए. खान :-**

लोकांची तक्रार आहे ना.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब ह्याच्यामध्ये अजून एक करता येईल. समजा, आर.एन.ए. ला नविन बिल्डिंग बांधायची असेल. तर बांधकाम विभाग टाउन प्लॅनिंग कडून परवानगी मिळण्याअगोदर त्यांचा एक रिमार्क घ्या ना त्यांनी जर टॅक्स भरला नसेल.

**मा. सभापती :-**

त्याची गरज नाही. कोणीही असू दे. एक बिल्डिंग असू दे किंवा पाच बिल्डिंग असू दे.

**प्रशांत पालांडे :-**

तुमचा रिमार्क पाहिजे ना.

**मा. सभापती :-**

आपण त्याच्या टॅक्सवर लिलावाची कारवाई करु.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब मी तेच तर सांगतो ना.

**अजित पाटील :-**

सन्मा. सदस्य एस. ए. खान साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला की शांती नगर संकूलनाला नगरपालिकेने जेव्हा एस.टी.पी. ताब्यात घेतल्यानंतर ह्या ७-८ वर्षापासून आपण विशेष स्वच्छता कर लावलेला आहे. या संदर्भामध्ये विशिष्ट प्रकारची बिल गेली. त्या फ्लॅट धारकांना त्यानंतर तिकडच्या सोसायटीने तक्रार केलेली आहे की नगरपालिकेने टॅक्सच्या लोकांनी आमच्याकडे मागणी केलेली आहे. असे असताना बिल्डरने सुद्धा नगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या कालावधीपासून टॅक्स वसूल केलेला आहे. स्थानिक नगरसेवक अनिल सावंत यांनी तक्रार केलेली आहे. १० सोसायटीने या संदर्भात तक्रार केलेली आहे. त्या तक्रारीच्या अनुशंगाने मा. आयुक्त साहेबांकडे हा प्रस्ताव गेला होता. त्यांनी बिल्डर स्थानिक नगरसेवक आणि सोसायटी यांची चर्चा करण्याकरिता २८ तारखेला बैठक बोलावलेली आहे. मेंटेनन्स चार्ज घेतल्याबद्दल सोसायटीने बूक सादर केलेले आहे. बिल्डरची संयुक्त बैठक ही स्थानिक नगरसेवकांसोबत दि. २८ ला होणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये प्रिव्हेंन्टी ॲक्शन काय घेणार? कायद्यामध्ये त्याला तो तर्कर लावायचा अधिकार आहे का? तो तुमचे पैसे घेवून गेला. कसल्या मिटींग घेता सेक्शन खोला आणि काहीतरी कायदेशिर कार्यवाही करा ना. अहो फोर्जरी होवू शकते, ४२० लागू शकते. सी.आर.बी.सी चे बोला. बाकी सोडून द्या. शांती स्टार बिल्डरला तुम्ही आतापर्यंत या महापालिकेनी नगरपरिषद असल्यापासून फक्त प्रोटेक्टच केलेले आहे बाकी काही केलेले नाही. आता पाण्याचे कशाला बोलता. त्याला ७.५० रु. ला देता आणि तो विकतो १५ रु. ला तुम्ही काय केले. सगळी मशिनरी तुमची पाईप लाईन फटाफट टाकून दिल्या. आज तुमच्या ह्याच्यात जवळ जवळ दलाली आहे. शांती स्टार बिल्डर करिता तुम्ही आतापर्यंत एवढया सेवा उपलब्ध करुन दिल्या. ह्याच्यामागचे धबक काय आहे? तो सुद्धा सेम बिल्डर आहे. बाकीचे पण सेम बिल्डर आहे. त्याचे तुम्ही एवढे लाड ढोसू नका. तुमची मंत्रालयात एवढी सेंटींग आहे की तुम्ही घाबरता आपले चिफ ऑफिसर ऑफिसला येवून पाटया टाकत बसतात. आम्ही बघितले. तुम्ही कार्यवाही काय करणार? कसल्या मिटींग घेता तुम्ही प्रिव्हेन्टचे ॲक्शनचे बोला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

तुमची २८ तारखेला बैठक होते ना तर तुम्ही त्याचा एन्ट्रींग ला पत्र पाठवावे की वसूली करता येणार नाही. केली तर गुन्हा दाखल केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब दिलेले आहे. महापालिकेचे पैसे त्यांनी केलेले आहे. त्यांनी रिफंड आमचा जमा केलेला आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

वसूली केलेली असेल तर जमा...

**मिलन म्हात्रे :-**

बैठकीत निर्णय नाही. पाटील साहेब बैठक ही कॉम्प्यूटर ऑथोरिटी नाही. आता सभागृहामध्ये विषय आलेला आहे ना. मा. सभापती साहेबांचे रुलिंग घ्या त्याचा आधार घ्या आणि नोटीस काढा. बैठक ही कॉम्प्यूटर ॲथोरिटी नाही त्यांनी सांगितले मी ऐकले पटल तसे नाही. आणि मा. आयुक्त साहेब एवढे सक्षम नाही. म्हणूनच ७० आणि ८० लाख रु. च्या वसूली झालेल्या आहेत. थकबाकी राहिले.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब पुढच्या वेळेला विषय घ्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

शांती नगरचे काय झाले? त्यासाठी तुमचे रुलिंग काय आहे?

**मा. सभापती :-**

त्याच्यावर नोटीस काढायला सांगू, त्याचे टॅक्स वसूल करायला सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी जी महापालिकेची रक्कम आतापर्यंत रक्कम ही एका आठवडयामध्ये जमा करावी.

**मा. सभापती :-**

सर्व वसूली करुन त्याच्यावर कार्यवाही करायची.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ती वसूली ह्यांच्याकडून होईल की नाही ते पहिले विचारा. आतापर्यंत वसूली झालेली नाही. तर पुढे होईल का? ते विचारा. जर, तुमच्याकडून होत नसेल तर आम्हांला सांगा. नाहीतर आम्ही दुस-या कोणत्यातरी अधिका-यांची नेमणुक करायला सांगू.

**मा. सभापती :-**

जर, आपली वसूली झाली नाही. तर, या जानेवारीमध्ये वसूली चालू झाली नाही. तर मला सांगा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तुमचे क्लार्क आणि सगळ्यांचे लागेबंधे बिल्डरशी असतात. तर हा पैसा दे दो मे बादमें देखता हूँ। तो हो जायेगा। असे त्यांच्या वार्ता आहेत. तुम्हांला किती वेळा सांगितले १०-१० बारा वर्षापासून हे अधिकारी आहेत. त्यांची तुम्ही सरळ बदली करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बरोबर आहे. एकाच पदावर आपले भरपूर क्लार्क एकाच पदावर वर्षानुवर्षे काम करतात आणि काही लोकांची बदली फटाफट होते.

**मिलन म्हात्रे :-**

आपले वरिष्ट अधिकारी चिफ ऑफिसर पासून त्यांच्या ऑफिसला जायला लागले आणि ते सांगतिल तसे करायला लागले. तर मग तो काही म्हणणार त्यांनी तुम्हाला एक रिझर्व्हेशन डेव्हलप करून दिलेले नाही आणि मुंबईमध्ये अशा मोठ मोठ्या बिल्डर लोकांना कोर्टाने टांगुन ठेवलेले आहे. जेव्हा आपली मानसिकता नसते ना तेव्हा काही होत नाही. एखादा छोटासा दहा बारा बिल्डींग चा फ्लॅटचे असते ना. तर त्या बिल्डर त्याला बरोबर सरळ करेल. आणि ती जी रक्कम आहे. व्याजा सकट ते सुद्धा तुम्ही ७० - ८० लाख रू. म्हणता. ते तुमच्या नियमानुसार व्याज १टक्के, २टक्के काय असेल ते लावून ती व्याजासकट वसुली पाहिजे. छोट्या खातेदाराकडून तुम्ही व्याज लावून घेता. ३ टक्के, ४ टक्के व्याज दर असते. ८० लाख रू. वर तुम्ही व्याजदर किती आकारले नाहीतर त्या सरदार वल्लभभाई पटेल चा मालक यांच्या सारखे होईल. त्यांनी ३५ लाख रू. थकवले होते ना. आणि बोलतो की, व्याज माफ करा.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, मिरा रोडमध्ये रसाज टॉकीज आहे. तर त्याचे किती पैसे बाकी आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते आता यादी देतात ना. तर पुढचा विषय घ्या ना.

**एस. ए. खान :-**

तीन चार वर्षापासून त्यांनी पैसे भरलेले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते बोलले ना चार दिवसात देतो. प्रभाग अधिका-यांकडून यादी मागवून देतात ना.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही इकडून सुरूवात करा. आपण आठवड्यामध्ये किती इंम्प्रुव्ह झालो.

**प्रशांत पालांडे :-**

आपण जुन्या इमारतींना नविन बांधकामाला परवानगी देतो. जुन्या इमारती एकतर डिमॉलिश करतात किंवा रिपेरिंग करतात. तर आम्हाला अशी माहिती मिळाली की, जुने टॅक्स जे थकीत असते नविन बिल्डींग झाले की जुन्या बिल्डींगला विसरतात असे तुमच्याकडे प्रकरण वगैरे आहे का?

**मा. सभापती :-**

जुन्या बिल्डींगला नविन टॅक्स.

**प्रशांत पालांडे :-**

मग जुन्या बिल्डींगचे काय?

**मा. सभापती :-**

जुने गेले.

**प्रशांत पालांडे :-**

जुन्या इमारतीचे थकित टॅक्सचे काय?

**अजित पाटील :-**

साहेब माझे म्हणणे असे आहे की, एखाद्या बिल्डींगचे टॅक्स थकवतो. त्याला नविन परवानगी देतो. तुम्ही त्याच्यावर टॅक्सचे रिमार्क ठेवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी आपल्याला अवगत करू इच्छितो, एखादा टॅक्स लागु झाल्यानंतर विभाग प्रमुखांना कोणताही टॅक्स कमी करण्याचे अधिकार नाही ते राईट अप करायचे असेल तर स्टँडींग कमिटी समोर घ्यावे लागते. असे शो माटो त्यांनी कमी करू शकत नाही. ते वसुलच करावे लागते.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी जे म्हटले ना ते वसुलीचे म्हटले. कमी नाही. त्यांनी थकबाकीचे सांगितले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जुन्या इमारतीचा टॅक्स नविन बिल्डींग बांधल्यानंतर ते टॅक्स होत नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, परमिशन कोण देते? नगररचना देते की नाही. मग त्यांना तुम्ही पत्र द्याना.

**शरद पाटील :-**

साहेब, हाविषय महत्वाचा आहे. आता ईस्ट ला दोन चार बिल्डींग आहेत ते तोडून ठेवलेल्या आहेत. त्याचे अजुन बांधकाम झालेले नाही. मग टॅक्स आता चालू राहणार की बंद राहणार.

**अजित पाटील :-**

बंद राहणार.

**शरद पाटील :-**

अर्धी बिल्डींग पाडलेली आहे. अर्धी बिल्डींग बाकी आहे.

**अजित पाटील :-**

त्या मालकाने आपल्याला कळवायला पाहिजे की, बिल्डींग पाडलेली आहे तर टॅक्स बंद करा त्यांनी कळवायला पाहिजे. ती त्यांची जबाबदारी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमची ही मालमत्ता पाडलेली होती. तर, आम्ही कळवले की, ही पाडलेली आहे. आमचे महापालिकेने स्टॉप केले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आणि जी बिल्डींग मिरा भाईंदर महानगरपालिका तोडते. त्यांचे काय? त्यांना पण द्यावे लागेल की रद्द करणार.

**अजित पाटील :-**

नगरपालिकेने तोडली असेल तर ती नोंद करतो की, नगरपालिकेकडून तोडण्यात आलेली आहे.

**शरद पाटील :-**

तशी तुम्ही नोंद केलेली आहे. तरी टॅक्स बंद होतो.

**अजित पाटील :-**

जी इमारत तोडली ना तर कमिशनर साहेबांची ऑर्डर असते ना.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या ह्याच्यात तसे झाले नव्हते. यायचे आम्ही पडलेल्या बिल्डींगचे एक वर्ष बिल पण भरले नंतर अकाउन्ट चे पैसे संपल्यानंतर आम्ही पत्र दिले की आमचे असेसमेंट बंद करा. कारण बिल्डींग नगरपालिकेने पाडले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, आता मॅडम ने येथे मुद्दा उपस्थित केला की, वर्षा नु वर्षे तेच क्लार्क त्याच डिपार्टमेंटला काम करतात. त्यांच्यावर आपले रूलिंग काय आहे?

**मा. सभापती :-**

ते प्रशासनाकडे असते. आपल्या नगरसेवकांकडे नसते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही सभापती आहात. तुम्ही आता आदेश द्या.

**मा. सभापती :-**

त्यांच्या तक्रारी माझ्याकडे आल्या नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, सदस्यांनी केलेल्या आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मी तुम्हाला तक्रार केलेली होती.

**मा. सभापती :-**

लिपिक ची बदली करण्यासाठी मी त्यांना रूलिंग देतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, धन्यवाद.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या मिटींगमध्ये तुम्ही एक पगार कमी करणार बोलला होता. मग तुम्हाला कुठले अधिकार आहे. तुम्ही आता काय बोलला की, आपण नगरसेवक आहोत. साहेब, तुम्हाला सगळे अधिकार आहेत.

**मा. सभापती :-**

खतगांवकर साहेबांनी सांगितले, पुढे चांगली रूलिंग झाली पाहिजे. चांगली कामे झाली पाहिजे वसुली अशी होत नाही म्हणून करता आली पाहिजे. कुठल्याही कामामध्ये अडथळा आला नाही पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

८० - ८० लाख रू. वसुल करत नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही ५६ नुसार बोलता आपण ५७ लावू एका महिन्यात किती होईल ते बघा.

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. १२ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

जाहिरात विभागाच्या कामकाजाचा आढावा घेणेबाबत.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, हे जे ४५ टक्के आहे ना. तर आपण एक आठवड्यापर्यंत किती झाली. प्रभाग समिती क्र. १ मध्ये ४५ टक्के ची मागणी वसुली मध्ये तुमची काही वाढली का? म्हणजे आता या आठवड्यामध्ये आपण कुठेतरी इम्प्रुव्ह झाले की नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

ह्याचा इफेक्ट तुम्हाला आठ - दहा दिवसाने मिळेल.

**मिलन म्हात्रे :-**

आठ दिवस गेले ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

तसे तुम्ही एवढ्या युनिटमध्ये मोजु शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आठ महिने काय केले? त्याचे उत्तर द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मागच्या पाच वर्षामध्ये जी वसुली आजच्या तारखेपर्यत होती. या वर्षाची वसुली ही जास्तीची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नाही ती ८० टक्के च्या वर वसुली गेली पाहिजे. नोव्हेंबरला आता नियम तो आहे. तुम्ही नियम करताना तर आम्ही काय करणार? तुम्ही बाकीच्या नियमावर कसे काय बोट दाखवता.

**अजित पाटील :-**

आपली एक मिटींग झाली ना. त्याच्यानंतर आता पर्यंतचा फिगर आहे. १७ तारखेचा एक कोटी ६१ लाख रू. वसुल झालेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

किती नंबर मध्ये तुम्ही प्रभाग समितीद्वारे सांगा.

**अजित पाटील :-**

प्रभाग समिती १ मध्ये १ लाख २९ हजार रू., प्रभाग समिती २ मध्ये १९,०७,२५८/- रू. नंतर ३ मध्ये ५३,९८,०००/- रू. आणि ४ मध्ये ८७,५९,०००/- रू.

**मिलन म्हात्रे :-**

आता खाली टोटल किती? सगळी टोटल सांगा तुमच्या प्रभाग समिती १ नंबर मध्ये प्रभाग अधिकारी कोण आहेत. त्याला समज द्या. १ लाख रू. वसुली होते म्हणजे काय?

**हेमंत पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, प्रभाग समिती १ मध्ये सर्वत्र जास्त निवासी घर आहेत. आणि त्यांची जास्तीत जास्त वसुली ही २००/- रू., ३००/- रू., ४००/- रू. आहे. म्हणजे मोस्ट ऑफ खातेदारांना भेटी देवून ती वसुली करावी लागते. दुसरी गोष्ट अशी आहे की, मोठे खातेदार ह्या प्रभागामध्ये नाही. माझ्या माहितीप्रमाणे ही जी वसुली झालेली आहे. ह्या चार दिवसामध्ये १,७०,०००/- कारण ५० की ५८ हजार रू. चा चेक आलेला आहे तो अजुन टाकलेला नाही. तर, हे छोटे खातेदार असल्या कारणाने आणि आमच्याकडे जे क्लार्क आहेत त्यांना घरपट्टी आणि पाणीपट्टी अशी दोन्ही वसुली करावी लागते. त्यामुळे जर घरपट्टीवर लक्ष दिले तर पाणीपट्टी वसुली होत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुमचा भाग कोणता आहे ते सांगा.

**हेमंत पाटील :-**

माझा भाग आहे मुर्धा गांव ते उत्तन पर्यंत.

**मिलन म्हात्रे :-**

मला सांगा, आता तुम्ही ही जी माहिती दिली की, तुमच्याकडे रेसिडेन्शीयल आहे आणि बाकीच्यांकडे कर्मशियल आहे असे तुमचे म्हणणे आहे का?

**हेमंत पाटील :-**

माझ्याकडे मोस्ट ऑफ रेसिडेंशियल एरिया आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बाकीच्या कुठच्याही नियमाच्या बाहेर जावून चर्चा करू नका. तुमची उधारी ४५.५ टक्के एवढी आहे हे तुमचे क्लिअर कट आहे. हा जो तुमचा फिगर आहे एकूण मागणीचा फिगर ३७,२३,०००/- रूपये जो काही फिगर आहे ती एक्झिटींग परिस्थिती आहे ती आजची तिकडची आहे आणि त्याचाच आहे. तो आता लगेच १५ लाख टाकले अशातला भाग नाही. म्हणजे तुमची जी रिकवरी आहे ती पुवर आहे. म्हणजे एकदम वाईट परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत तुम्हाला स्टाफ दिला. गाड्या दिल्या. हे सगळ करण्याकरिता तुम्ही आणि आम्ही बसलो. सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, ठिक आहे. आम्ही समजु शकतो. ह्यांनी जास्त केले म्हणून त्यांचा फिगर मोठा आहे. पण तुमची ३६ लाखा पर्यंत फिगर आहे. तर आता जानेवारी महिन्यामध्ये पुर्ण फायनल बजेट करायचा आहे. आता जर आम्ही टिंगल टवाळ्या करायला बसलो तर जानेवारीमध्ये सर्व भोगायला लागणार तिकडे असे ओढातान करता येणार नाही. आणि आपण आपले फक्त अंदाज बांधायचे. मी तुम्हाला परत परत सांगतो ४५ करोड रूपयाचे संकट तुमच्यावर एप्रिल महिन्यात येणार. एप्रिल महिन्यामध्ये तुमच्या बजेटचे ५० करोड रूपये झपकन कमी होणार आहे आता आपण अंदाजे ८० लाख रे. ९० लाख रू. लावतो. त्यातले ग्रँड वगैरे ५० लाख पकडून चला आमची ही जी आदळआपट चालले त्याचे कारण ते आहे. आस्थापनामध्ये तुमचे पगार निघायचे आमचे काही नाही. आम्हाला पाच हजार रू. मानधन दिले नाही तर काही फरक पडत नाही.

**मा. सभापती :-**

अजित पाटील साहेब, त्यांच्याकडे माणस कमी असतील तर त्यांना माणसे द्या.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना विचारा त्यांना बोलू द्या. आपण सगळ दिलेले आहे.

**हेमंत पाटील :-**

प्रभाग समिती क्र. आर वॉर्ड, पी वॉर्ड आणि एस.टी. वॉर्ड ह्याच्यासाठी फक्त एक एक क्लार्क आहे. मी तुम्हाला सांगितले की, ते पाणी पट्टीची पण वसुली करतात. जर आपल्याला कार्यवाही करायची असेल तर ते बाहेर जातात आणि येथे पाणी पट्टीची वसुली होत नाही आणि मोस्ट ऑफ एरिया जो आहे तो जास्त कि.मि. चा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुमच्याकडे पाणी पट्टीची माणस का नाही? पाणी डिपार्टमेंट मधले क्लार्क का नाही?

**हेमंत पाटील :-**

ही वस्तुस्थिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पाणी पुरवठ्याची माणस का नाही? तुमच्याकडे माणस कमी आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो आता प्रभाग अधिका-यांनी जी माहिती दिली ती वस्तुस्थिती आहे. पुर्वी पासुन चालली ही परिस्थिती आहे. टॅक्स आणि पाणीपट्टी एकच क्लार्क वसुल करतात त्याबाबतीत एक दोन वेळा मा. आयुक्त साहेबांकडे मिटींग पण झालेली आहे. त्याचा दोन्हीवर इफेक्ट होतो. जर तुम्ही क्लार्क दिले तर वसुलीवर फरक पडेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

किती लोक आहेत ते तुम्ही सांगत नाही. प्रभाग समिती १ मध्ये वसुलीसाठी एकुण किती लोक काय करतात ते सांगा.

**हेमंत पाटील :-**

साहेब, आमच्याकडे दोन क्लार्क वसुलीसाठी आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे साहेब, इतर सर्व खात्याची लोक वसुलीसाठी आहे. जकात पण झालेली आहे. जकात ची वसुली सुद्धा झालेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, माझे म्हणणे तर स्पष्ट आहे की ते बरीचशी माहिती तुमच्याकडून लपवतात. ती जर आम्ही फिरतो. आम्ही उघड्या डोक्याने सरळ बघतो. आपला स्टाफ कामावर आला. कार्ड पंचिंग केले की, सर्व घरी निघुन जातात. तुम्ही आज कधीही एक सरप्राईझ व्हिजीट या वॉर्ड ऑफिसला द्या. तुम्हाला निम्मा स्टाफ घरी भेटेल. म्हणून आता हे जे बोलले ना आत्ता उत्तनला हे स्थानिक असतील. राई, मोर्वा, मुर्धा स्थानिक दुपार झाली की सर्व घरी जावून घरी बसतात. तुम्ही त्यांची बदली करा ना. त्या मुर्धे करांना इकडे आणा. इकडच्या लोकांना तिकडे टाका. रिशेपल थोडे करा ना. किती माणस आहे ती फिगर सांगा.

**हेमंत पाटील :-**

वेगवेगळ्या ठिकाणावरून येतात. काही ठाण्यावरून येतात विरार वरून येतात. काही डहाणू वरून येतात. पर्टीक्युलर सांगता येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

लोकल किती आहेत.

**हेमंत पाटील :-**

माझ्याकडे लोकल माणस तीन आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

माझे म्हणणे असे आहे की, त्या एरियामध्ये दूपारनंतर लोक दिसत नाही. वसुली बरोबर करून येतात. पण त्या दुस-या वसुली करून येतात. आज शिवनेरी मध्ये संपुर्णपणे विदाउट मिटर गेल्या बरेच वर्षापासून पाणी चालू आहे. हजार रू. चे बिल ज्या माणसाकडून येते. त्याच्याकडून २०० रू. घेतात आणि त्याला ३०० रू. चे बिल लावता. तुमचे ७०० रू. निव्वळ लॉस जातो. पुर्ण शिवनेरीमध्ये कोणत्या वॉर्ड ऑफिसरचे लक्ष आहे का? कोणी तिकडे बघायला गेले का? आणि तुमचे पाण्याचे जे प्लंबर राहतात ना ते सुद्धा हजार पाचशे रू. घेतल्याशिवाय कामे करत नाही. त्या वसुल्या कशा होतात? कनेक्शनची नावे आणि फिगर देवू का? सर्व माझे तोंडपाठ आहे.

**हेमंत पाटील :-**

संपुर्ण प्रकरणाची माहिती तुम्हाला पुढच्या सभेमध्ये सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

पुढच्या सभेत देतो कितीवेळा उत्तर झाले. तुमच्याकडे माणस किती वाढवून पाहिजे ते बोला, पिउन किती पाहिजे, क्लार्क किती पाहिजे ते बोला.

**हेमंत पाटील :-**

मला आणखिन चार क्लार्क पाहिजे आणि चार शिपाई पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमच्याकडे स्टाफ किती आहे?

**हेमंत पाटील :-**

माझ्याकडे स्टाफ आहे आर वॉर्डमध्ये १ क्लार्क २ शिपाई आहे. प्रत्येक वॉर्डमध्ये १ क्लार्क २ शिपाई आहे. म्हणजे ३ क्लार्क आणि ६ शिपाई आहे. बाकीचे झाडू कामगार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मुख्यालय उपायुक्त त्यांना वाढवून द्या. तुम्ही ॲडजेस्ट करा. आपल्या इकडचे केबिन मध्ये बसणारे एक एक शिपाई कमी करा. हरी भाउच्या केबिनच्या बाहेर पाच पाच सहा सहा शिपाई बसलेले असतात. ते काय काम करतात ते कळत नाही. तुम्ही त्यांना बाहेरच्या कामाला लावा.

**नगरसचिव :-**

माझा स्टाफ देता येत नाही. आमच्या प्रोसिडींग असतात. अजेंडा वाटायचा असतो. सेट लावायचे असतात.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या आतला जो स्टाफ आहे त्याच्या व्यतिरिक्त बाहेर जे बसलेले आहेत त्यांना पाठवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तीन महिन्यासाठी स्टाफ द्यावा लागतो मार्च पर्यंत द्यावा लागतो. एक दोन दिवसासाठी देवून नाही चालत.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचे रडगाणे जानेवारीपर्यंत चालू राहील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

रडगाण्याचा काय संबंध आहे. एकदा बिल नोटीस वाटले आपण दारोदारी जावून पैसे मागत नाही. जे हॉल्ट आहे त्यांचे जे ३६ लाख रू. कमी आहे ना त्याच्यामागे परसुएशन करायचे असते. हाउस टु हाउस आपण प्रत्येकाकडे जात नाही. जे डिफॉल्टर आहे त्याचे नियोजन त्यांनी करायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी आता दुसरे एक वक्तव्य केले की, तिकडे फार कमी वसुली आहे. म्हणजे ३०० रू., ४०० रू. आज मोस्टली तिकडे आर.सी.सी. ची सगळी कामे झालेली आहेत. त्याचा टाईप ऑफ स्ट्रक्चर तुम्ही बदलला का तुम्ही स्वतः रिव्युव्ह घेवून यायचो आणि आज येथे एवढा मोठा बंगला झाला त्याचे २५००/- रू. होणार आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

त्याचे रिव्हाईज ॲसीस्ट होण्याची कारवाई करा. त्या मध्ये बदल झालेला आहे. त्याची नोंद घ्या.

**एस. ए. खान :-**

साहेब, माझी अशी सुचना आहे की, इलेक्ट्रीक बिल वगैरेचे काउन्टर असतात. तसेच बँकेत वगैरे चे काउंटर द्या. काउंटर मध्ये पैसे भरले की ताबडतोब ......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

प्रत्येक प्रभाग कार्यालयामध्ये नॅशनलाईझ दोन बँक आयडेंटीफाय करून ह्या पंधरा दिवसामध्ये आपण पैसे भरण्याची सोय करू.

**मिलन म्हात्रे :-**

चांगल आहे ना वाईट कुठे आहे? उत्तनला देना बँक आहे, बॅसिन कॅथलिक बँक आहे. राई गाववाले ठाणा बँकेत भरू शकतात.

**एस. ए. खान :-**

मिरारोडला समोरच कॉर्पोरेशन बँक आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

अजित पाटील ह्याची नोंद घेउन प्रस्ताव तयार करा. प्रत्येक प्रभाग कार्यालयाच्या एरियामध्ये दोन बँक आयडेंटीफाय करायचे आणि बिल अकाउन्ट मध्ये जमा करायचे. जसे एम.एस.ई.बी. कंपनी घेते त्या पद्धतीने आपण फक्त जमा करून घ्यायचे आणि त्यांची पेस्टिंग त्याचे जे लेजर येतात त्याप्रमाणे विभागात घ्यायचे.

**एस. ए. खान :-**

मिरा रोडला जास्त बँक आयडेंटीफाय आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मिरा रोडला बघा परत पेणकर पाड्याला स्टेट बँक आहे. तो एरिया तिकडे डिवाईड होईल. ह्या साईडला सिल्व्हरपार्क च्या साईडला घ्या. श्यामराव विठ्ठल बँक आहे. ती तुम्हाला सेंटरला पडते. त्यानंतर तिकडे बेसिन कॅथलिक बँक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, त्या दिवशी हा ठराव झालेला आहे. कोणत्या बँकेला कनव्हेन्सच केलेला नाही. बँक येत नाही हे लोक जात नाही तर तुम्ही बँकेचे नाव का लिहिता? ठराव होवून चार वर्षे झाली कुठल्या बँकेला कनव्हेन्स केलेले आहे?

**एस. ए. खान :-**

ठिक आहे. आता झाले ना. आता करू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठराव होउन चार वर्षे झाली.

**एस. ए. खान :-**

ठराव झाला पण अंमलबजावणी झाली नाही तर काय करणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

होत का नाही? कारण काय आहे?

**एस. ए. खान :-**

आता फॉलोअप करू ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य खान साहब, बँक वाले क्यो नही आते यह उनको मालूम है। अपना आदमी जाता है को ऑपरेटिव बँक मे खाली अपने सेवा के लिए अकाउन्ट नही देता है।

**एस. ए. खान :-**

देंगे ना।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वही तो बात है।

**एस. ए. खान :-**

साहेब, अगर वह लोग एफ.डी. मांगते है तो हमलोग भी एफ.डी. देते है। और फिर सेवा लेते है। फुकट सेवा कोणी देणार नाही. कॉर्पोरेशन बँकने सांगितले की, मिरा भाईंदरची एफ.डी. साहेब तुम्ही येथे करा आणि ती बँक प्रभाग कार्यालयाच्या समोरच आहे. जर काही अडचण असेल तर, आपण फॉलोअप करून घेवू ना. पूढच्या वर्षी बँकेत टॅक्स जमा करून टाकू याची नोंद घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

निश्चित ती कार्यवाही सुरू करू.

**एस. ए. खान :-**

मिरा रोडला चार पाच बँक करा आणि ते एफ.डी. वगैरे काय मागतात ते त्यांना द्या.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, जाहिरात विभागाची कर आहे. जाहिरात कर किंवा इतर कर डिवाईडर कमानी २००८ मागिल १९,७४,०००/- रू. त्यापैकी वसुली डिसेंबर अखेर ८,७२,०००/- रू. झाली. ठेका होल्डींग वाढीव आकार, प्रदुषण वातावरण.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एक विषय होउ द्या. आधी एक विषय पुर्ण करा. जाहिराती कर, इतर कर, डिवाईडर, कमानी कर तुम्ही मागे दिले. मला एक सांगा प्रशासकिय ठराव क्र. ८६, दि. ३१/०५/०२ त्या ठरावामध्ये टंडन एन्ड एसोसिएशन ह्याला आपण ठेका दिला होता. जाहिराती बद्दल माहिती घेवून त्यानंतर पाच वर्षाचा ठेका प्रशासकिय काळामध्ये दिला गेला.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

नंतर स्टँडीगला विषय आला. स्टँडींगला विषय मंजुर करूनच हा विषय केला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मला सांगा, टंडन ने जो रिपोर्ट दिलेले आहे ते रिपोर्ट काय आहे.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, टंडन ने फक्त सर्व्हे केलेला आहे. त्याची अपसेट प्राईज काय आहे आणि कशा प्रकारचे टेंडर असले पाहिजे. ते त्यांनी अपसेट प्राईज ठरवून ते टेंडर आपण मंजुर केले.

**मिलन म्हात्रे :-**

टंडन ने किती बील दिले? आमच्या माहितीनुसार ३५ लाख रू. बिल दिले.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

पी.डब्ल्यु.डी. कडून दिलेले आहे. ते मला माहित नाही.

**मिलन म्हात्रे :-**

३५ लाख रू. बिल दिलेले आहे. त्याची तेवढी रिकवरी नाही इकडे.

**एस. ए. खान :-**

३५ लाख रूपयाची अमाउन्ट दिले.

**मिलन म्हात्रे :-**

पानपट्टे साहेब हा तक्ता तुम्ही असा दिला तर मेहरबानी करून परत देवू नका. ह्या बाजुला तुम्ही जे परसेंटेज दिलेले आहे ना. त्या परसेंटेज मध्ये तुम्ही किती मायनस आहात.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, टोटल परसेंटेज दिले ना.

**मिलन म्हात्रे :-**

ते नाही आम्ही काढले ना पहिला तक्ता जो आहे. त्यात १) तुम्ही ५५ टक्के डेफिसेशन आहात. २) ५० टक्के डेफिसेशन मध्ये आहात. ३) पे एन्ड पार्क मध्ये तुम्ही ७५ टक्के डेफिसेशन मध्ये आहात. हे डेफिसेशन अमाउन्ट तुम्ही किती वसुल करता. आज हे जे आहे ना ते व्यवस्थित कोष्टक दिले की, एवढी टक्केवारी वसुलीची बाकी आहे. बर हे कोष्टक देत असताना सुद्ध थकीत टक्केवारीची बाकी हे दिलेले नाही.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, थकीत बिल आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा हे बोलते ना.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**

त्यांच्याकडेच बोलत नाही आमच्याकडे नाही. आमच्याकडे १०० टक्के वसुल होते म्हणून थकीत चा प्रश्न येत नाही. ठेक्याने होल्डींग दिल्यामुळे वेळोवेळी दोन हफ्त्यात पैसे देतात. १ एप्रिल ते .......

**मिलन म्हात्रे :-**

मला हे सांगा की रक्कम आजच्या मिटींगमध्ये तुमच्याकडे नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जाहिरात कराबद्दल विषय घ्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, जी रक्कम आजच्या तारखेला तुमच्या हातात नाही. ती थकीत आहे.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**

साहेब, होईल ना ३१ मार्च पर्यंत होईल आपण दोन हफ्त्यात बिल काढतो.

**मिलन म्हात्रे :-**

आपला पुरा बजेट कधी होईल त्याच्या अगोदर आले पाहिजे की नाही.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**

तसे नाही ३१ मार्च पर्यंत वसुली होते.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे असे म्हणणे आहे का त्यांचे आतापर्यंतचे जे थकीत आहे ते पुर्ण दिलेले आहे.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**

मी तसे कुठे म्हणतो. आपल्याकडे बी.पी.एम.सी. कायद्यानुसार आपली वसुली १ एप्रिल ते ३० सप्टेंबर पर्यंत एक हफ्ता आणि दुसरा हफ्ता १ ऑक्टोबर ते १ मार्च पर्यंत अशा दोन हफ्त्यामध्ये वसुली करतो पहिल्या हफ्त्याचे पुर्ण वसुली झालेली आहे. दुसऱ्या हफ्त्याचे ३१ मार्च पर्यंत १०० टक्के येतील.

**मिलन म्हात्रे :-**

हाउस रेट तुम्ही ॲडव्हांस कसे घेता? तुमच्याकडे रेट घ्यायची प्रोव्हिजन आहे ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

हाउस रेट ची सुध्दा दोन वेळा बिल पाठवण्याची प्रोव्हिजन आहे. आपण त्यावर आरोप करत नाही. कायद्याने तशीच प्रोव्हिजन आहे. दोन हफ्त्यामध्ये वसुल करायची.

**मिलन म्हात्रे :-**

आता बाकी राहिली किती? तुमचा पहिला हफ्ता कितीचा आहे ते सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

५० टक्के वसुली झालेली आहे. आता दुसरी ५० टक्के वसुली होणार.

**मिलन म्हात्रे :-**

पुढे तर पे ॲण्ड पार्कचे ७५ टक्के वसुली झालेली आहे.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त सो.):-**

पे ॲण्ड पार्क चे १०० टक्के वसुली व्हायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

नोव्हेंबर महिन्यामध्ये ७० टक्के क्रॉस केले पाहिजे. नोव्हेंबर महिना गेला त्यांचे किती हफ्ते आहेत. दोन आहे. चार आहे किती आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

कशाचे?

**मिलन म्हात्रे :-**

हे जे तुम्ही आता दिले त्याचे..

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

दोन हफ्ते आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

दोन हफ्ते म्हणजे सहा सहा महिन्याचा एक हफ्ता असे आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हे पे ॲण्ड पार्क चे नाही त्याचे महिन्याचा पैसे येतात. त्याचे जो पर्यंत अकाउंडला ५० टक्के जमा रक्कम भरलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आता हे सांगा हा जाहिरातीचा टेंडर कुठल्या तारखेला व किती दिवसाचा निघाला? ते सांगा?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

पहिल्या विषयावर विचारता की, दुसऱ्या विषयावर विचारता?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी जाहिरातीचे विचारतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जाहिरात म्हणजे जाहिरातीवर जाहिरात करता. समजा विक्रम ट्रेडर असे दुकान असेल त्यावर दुसरे नोकियाची जाहिरात असेल तर ती जाहिरातीवर जाहिरात त्याचे आपण पे जाहिरात घेतो. तो विषय वेगळा आहे तो जाहिरात कर आहे त्याचे आपण दरवर्षी फिजिकली सर्व्हे करतो. त्यानुसार बिल पाठवतो मग, वसुली करतो.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त सो.):-**

आपण त्यांना जो वसुलीचा ठेका दिलेला आहे ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टंडन रिपोर्ट आल्यानंतर.....

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तो विषय वेगळा आहे तो होल्डिंग्ज बद्दल आहे. आणि पे ॲण्ड पार्क बद्दल आहे. तुम्ही विषय मिक्स करु नका. पहिला जो विषय आहे जाहिराती कर होल्डिंग्जवर होल्डिंग्ज ....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बरोबर दुकानावर होल्डिंग्ज लावले. त्याच्यावर आपण कर वसुल करतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तो कर आपण वसुल करतो.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त सो.):-**

होल्डिंग्जचा ठेका सगळ्यांना द्यायला लागतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब,तुम्ही जाहिरातीच्या करामध्ये तुम्ही किती कर अपेक्षित केले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तेवढीच कशी त्यांची मागणी फिक्स असते. ज्यावेळी आपण सर्व्हे करतो तर कधी कधी नोकियाचे बोर्ड कंपनी कडुन टाकतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, माझ्या माहितीप्रमाणे तुम्ही छोट्या दुकानदारांना पण बिल पाठवली. आणि आज भाईंदर मध्ये पण किमान ५० हजार छोटे मोठे दुकानदार आहे तर तुमच्या मागणी समोर बघता काही नाही.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

डिपार्टमेंट बघते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही ह्यांचा फिगर सांगा ना. डिपार्टमेंटची किती मागणी अपेक्षित होती.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

त्यांनी दिले ना १९ लाख ७४ हजार रुपये ....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ती टोटल आहे ना. इतर कर, डिवाईडर कर, आणि कमानी कर, सर्व मिळुन झाले तर जाहिरातीचे किती येतात. ते मी विचारतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जाहिरातीचे अंदाजित १४ लाख रु. आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जाहिरातीची वसुली किती झाली?

**एस.ए.खान :-**

१४ लाख रु. डिमांड होती.

**मिलन म्हात्रे :-**

१४ लाख रु. ७ लाख रु., ७ लाख रु. बाकी ५० टक्के चा ॲव्हरेज समोर देतो. एकदम क्लिअर आहे. साहेब, तुम्हाला एक सांगतो मागच्या कईक स्टॅण्डींग पासुन आम्ही तुम्हाला परत परत सांगतो मागची इतिवृत्तांत काढा. जरा थोडा बोध होईल. आम्ही हजारो वेळा सांगितले की, या शहरामध्ये तुमचे शहरामध्ये तुमचे शहर अक्षरशः घाणेरड्या कलरने किंवा स्टिकर ने कुठे कुठे बॅनर बत्तीवर सगळे कॅलेंन्डर टाईप लावतात. हजार वेळा सांगितले ते जे जाहिरात दार आहे. त्यांचे फोन तुम्ही कलेक्ट करा. त्यांच्याकडे १० - १० हजार रु. ची बिल पाठवा. शहर अस्वच्छ होते. ज्या

ठाणे महानगरपालिकेमध्ये असा एक दावा चालला आणि ठाण्याच्या डिस्ट्रीक्ट जज ने त्या कंपनीला १० हजार रु. च्यावर दंड केला. त्याच्यावर केस चालले. तो केस लढतो की वापरा. हे तुम्हाला मी सांगितले. कोणी ऐकत नाही. छोट्या स्टिकर पासुन जर तुम्ही व्यवस्थित केले तर शहर पण स्वच्छ राहिल. तुमची इनकम होईल तुमच्या स्टाफने जावुन डिक्टेट करुन यायचे आहे. ॲडमिनियर काहीतरी काढुन आणायचे आहे. पंचनामा करा. त्याला १० हजार रु. दंड पाठवुन द्याना तुमचे स्वतःचे सर्व्हे नसतांना कोण काही बघत नाही. अधिकारी गाड्यातुन फिरत असतात. कोणाला काही कळत नाही. एक असा स्पॉट ठेवलेला नाही. लाईटच्या बत्तीच्या पोल पासुन छोटी छोटी हॅड बिल चिटकवुन टाकतात. त्याला फ्लोरोसन्ट कलर असतात. गुलाबी, पिकळे,लाल पोपटी असे कलर असतात. ते बघवत पण नाही. अशा सगळ्यांनी शहर सगळे विद्रुप करतात. त्याच्यातले तीन कन्सेप्ट तुमचे होतात. त्याच्यातली एक वसुली रेग्युलर होइल. पैसा व्यवस्थित मिळाला तर तुमची आर्थिक व्यवस्थित चालेले आणि शहर जरा. साफ सुधरे राहील तुम्ही हे सांगा की, किती प्रायव्हेट कंपनीचे बोर्ड जप्त केले आणि त्याच्यावर अशी कार्यवाही केली.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

वेगवेगळे बोर्ड काढुन टाकु.

**मिलन म्हात्रे :-**

मला तुम्ही सांगा ना. १०० बोर्ड जप्त केले त्यातला आम्ही एवढा दंड भरला.

**एस.ए.खान :-**

कार्यवाही काय केली?

**शानु गोहिल :-**

कार्यवाही तो कब होती नही। जभी भी हम कंम्प्लेन्ट करो तो कहते है की, हमारे पास सेफ्टी नही है। हमारे पास गाडी नही. है। और वह होर्ल्डिंग्ज निकालते नही है। हमलोग लेटर से लेटर देते है। पर्सनली जाके मिलते है। तो अधिकारी अपने जगह वे नही होता है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तीन सेफ्टी आणि दोन क्लार्क, १ क्लार्क आणि २ शिपाई फक्त पाचचा सेफ्टी आहे.

**शानु गोहिल :-**

तुम्ही सेफ्टी घ्या ना. तुम्ही सेफ्टी वाढवा ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

वाढवतो.

**शानु गोहिल :-**

किती वेळा कंम्प्लेन्ट करुन त्याच्यावर इंम्प्लीमेन्टेशन होत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ते झाले पण, तुम्ही त्याच्या दंड किती पाठवला? तुमच्या कायद्यात ती तरतुद आहे, की आमच्या ह्या सार्वजनिक मालमत्तेवर जप्तीकर.....

**बालाजी खतगांवकर ( मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

एक सुचना फार चांगली होती. जे कोणी जाहिरात करतील ते प्रेक्षक म्हणुन खाली कॉर्नरला नाव, मोबाईल नंबर, पत्ता ते सगळे कंपल्सरी ठेवायला लावायचे. आणि तशी जाहिरात नसेल तर ते काढुन फेकुन टाकायचे असे एक धोरण करा म्हणजे लक्षात यायला पाहिजे की, ही जाहिरात कोणाची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, फेकुन नाही. ज्यांनी बेकायदेशीर लावले ना त्यांना तुम्ही पाच दहा हजार रु. चा दंड आकारा.

**बालाजी खतगांवकर ( मा. उपआयुक्त (मु.) सो.):-**

बी.पी.एम.सी ॲक्ट खाली कार्यवाही करुन केसेस करायला लागतात.

**शरद पाटील :-**

साहेब, आपल्या रस्त्यांचे जे फलक लावले ना. त्याच्यावर सुध्दा पोस्टर चिटकवतात.

**मा. सभापती :-**

केसेस साठी कार्यवाही करु नये खाली बोर्ड काढुन घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

कार्यवाही का करु नये? एवढा वेळ चर्चा चालले ती काय?

**मा. सभापती :-**

आपले जेवढे केसेस चालु आहे. त्याच्यातले....

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही नको ते बडबडु नका तुम्ही ज्यावेळेला दंडात्मक कार्यवाही कराल.त्यावेळेला तुम्ही वसुली कराल अन्यथा नाही.

**मा. सभापती :-**

या केसचा आपला....

**मिलन म्हात्रे :-**

असु द्या. आपण भरपुन पैसे लावतो.

**मा. सभापती :-**

एक केसंचा तरी निकाल लागलेला आहे का ह्या महापालिकेच्या

**मिलन म्हात्रे :-**

म्हणुन आपण संगळ मोकळ सोडुन द्यायचे का? हा कुठला नियम आहे.

**मा. सभापती :-**

आपले त्याच्यावर पाहिजे ..

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाने जी दंडात्मक कार्यवाही करायला दिले ती तुम्हाला करायची असेल तर तो तुमचा भाग आहे.

**मा. सभापती :-**

मी सांगतो आपल्याला केसेसला जायला नको.

**मिलन म्हात्रे :-**

काही गरज नाही. तुम्हीला सांगतात खोटे आणि भलती कडे जातात. ती पहिली केस घ्या. कोर्टाची एक पध्दत आहे. तुमच्याकडुन एक फॉर्म दिला जातो. त्या पेशागिला तो माणुस तिकडे हजेरिला गेला तर तो जज चा क्लार्क असतो. तो तिकडे सही करुन देतो. कोर्टाची तारिख टाकतो. आणि त्याला कार्टातुन किती वाजता रिन्ह्युव्ह दिला जर ३.०० वाजात रिन्ह्यव्ह केले त्या अधिका-याला तर तो प्रवासाचा वेळ वगळता त्याएक तसानंतर महापिालकेच्या कार्यालयात हजर झाला. पाहिजे. असे किती अधिकारी आणुन देतात. ते मला सांगा हा कोर्टाचा रितसर आहे. तुम्ही चुकता. आपण राजकारणी आहेत ना. ही पध्दत सुरु करा.कुठल्याही डिपार्टमेंटचा अधिकारी जात असेल त्याला ती रितसर पावती द्या तो रितसर जात असेल. तिकडुन त्यानी समज दाखवली तो टाईमिंग टाकतो.की, तिकडुन त्यांनी समज दाखवली तो टाईमिंग टाकतो की, व्यक्ति इतक्या वाजता कोर्टात आली आणि जर त्यांची सुनावणी ५.३० वाजता. झाली तर तो ५.३० चे टाईमिंग टाकतो. आणि स्वतःचा शिक्का मारुन सही करुन देते. तो त्यांनी आपल्या आस्थापनेत आणुन दिला पाहिजे. इकडे काय करतात. हजेरी लावतात. गाड्या महापिालकेच्या अधिका-यांची नावे सांगु का?

**मा. सभापती :-**

हा नियम आपण पण चालु करु या.

**मिलन म्हात्रे :-**

करा ना करु या म्हणजे काय? आणि सगळ शिस्तीचे काम त्या प्रशासनाने करायचे. त्याच्यात आपण बोलायचे नाही सेक्शन सगळे बांधलेले आहे. तुमचे रुलिंग असे पाहिजे. कायद्यात जी तरतुद आहे. त्यानुसार कार्यवाही करा. म्हणजे ते बरोबर जातील.

**मा. सभापती :-**

मा. महासभेत कुठले निकाल लागले नाही. ते निकाल लावुन ..

**एस.ए.खान :-**

तुम्ही त्या अधिका-यांना बोलवा.

**मा. सभापती :-**

मा. महासभेमध्ये विषय घेवुन विचार विनिमय करेल.

**एस.ए.खान :-**

आपण आता पण असे इनस्ट्रक्शन द्या की, साहेबांनी सांगितले तसे द्या. तसे करुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

कायद्यात ती पद्धत आहे. एका डिपार्टमेन्टला अजित पाटील आहे.

**मा. सभापती :-**

जो एडव्होकेट रहते है उनके पास सब केसेस रहते है ना।

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तसे नाही. एका डिपार्टमेंटला अजित पाटील आहे. त्यांच्याकडून एम. आर.टी.पी. ची केस फाईल झाली. म्हणजे कंम्प्लेंनर अजित पाटील समजा आता ह्यांची बदली झाली आणि त्यांच्या जागेवर विजय पाटील आले. त्यांच्यावर जी कंम्प्लेंट आहे तेच त्या केसला जाणार. विजय पाटील जाणार नाही. त्याकरिता सगळ्या कर्मचा-यांकरिता जे कोणी आता काही लोकांचे खाजगी केस आहे ते आरोपी म्हणून जातात. त्यांना आपला महापालिकेचे प्रोटेक्शन नाही. पण ते काय करता कोर्ट केस आहे म्हणून तुमच्या अस्थापनेवर सही करून निघुन जातात. भर पगार त्यांना चालू राहतो आणि आरोपी तिकडे उदा. लाच घेताना पकडला तो तुमचा आरोपी आहे. त्यांनी तुम्हाला प्रोटेक्ट करायचे

नाही. त्याला पगार देवून चालत नाही अशी माणस पण हेजेरी लावून जावून येतात. येथे कुठेतरी बंधन आणाल की नाही? की तो कोर्टात महापालिकेच्या वतीने गेला?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, ह्यांनी जाहिरात कराची १४ लाख रू. मागणी केली होती. पाच लाख रू. चा एक टर्न झाला.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही त्याच्यावर रूलिंग द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही पहिला रूलिंग द्या. योग्य ती कार्यवाही ताबडतोब करावी. जे स्टीकर लागलेले आहे ना त्याच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. अशी रुलिंग द्या.

**मिलन म्हात्रे :-**

सार्वजनिक ठिकाणी जे काही बेकायदेशिर होर्डींग कॅलेन्डर्स लावतात, स्टीकर्स लावतात. पिक्चरची पोस्टर्स येतात. एम.टी.एन.एल. च्या बॉक्स वर पिच्चरची पोस्टर्स असतात. तुमच्या रिलायन्सच्या बॉक्सवर सगळी पोस्टर्स असतात. तुम्ही जे काही खाजगी टेलिफोन सिस्टम चालू केले. त्याच्यावर, भिंतीवर सगळ्यांवर लावतात अशा वरती तुम्ही दंडात्मक कार्यवाही प्रशासनाने करायची. असे तुमचे रूलिंग आले पाहिजे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे जे आपले कर्मचारी कोर्टात जातात. ते सुद्धा चिठ्ठी घेवून न जाता ती घेवून गेली पाहिजे. अशी व्यवस्थित ठणठणित रूलिंग द्या. आणि पुढची मिटींग सुरू करा.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

एम.एस.ई.बी. च्या बोर्डावर पोस्टर, स्टीकर लावतात. बिल्डींग वर लावतात छोटे छोटे स्टीकर लावतात. मोठ्या कॉम्प्लेक्स वर लावतात. तर ७ लाख लोकसंख्या आहे.....

**मिलन म्हात्रे :-**

असु द्या. ३ वर्षे झाली आम्ही तुमचे रडगाणे ऐकतो तुम्ही रेल्वेचे स्टेशन घ्या. मेन नाके घ्या. काशिमिरा नाका घ्या. काम करायची तुमची जर इच्छा असेल तर कुठेही अडचण चालणार नाही. माझा पत्र व्यवहार आहे. त्यांच्या कायद्यामध्ये तरतुद आहे. तुम्ही आम्हाला वसुलीचे बोलायचे तुमचे रडगाणे आम्हाला ऐकायचे नाही.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

असे होणार ना.

**मिलन म्हात्रे :-**

होणार ना काय झालेच पाहिजे. तुमच्याकडे अतिक्रमण आहे. तुम्ही किती काहीही पकडता. शहरामध्ये १००-१०० च्या गाय फिरतात. तुम्ही वसुलीचे बोला. तुम्ही सक्षम नाहित का? नाहीतर तुम्ही सोडून द्या. आणि सक्षम असाल तर काम करा. ते चालणार नाही. तुम्ही ते बोलायचे नाही. तुमच्याकडे बेवारशी जनावरे पकडण्या करिता भरपूर स्टाफ आहे. सरळ सरळ सांगता आम्हाला हे शक्य नाही ते शक्य नाही.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्यांना सांगतो की, मी सक्षम नाही तर तुम्हाला मला बोलण्याचा अधिकार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही सक्सेस नाही हे आम्हाला बोलायचे नाही तुम्ही आता काय बोलला की ७ लाख रू. ची बसुली आम्ही करू शकत नाही. मग कशासाठी कामावर येतात. तुम्ही त्याचा मार्ग काढा. आम्ही तुम्हाला सांगतो ना. चार नाके तुम्ही एकदम करा. काशिमिरा नाका घ्या. भाईंदर इस्ट, भाईंदर वेस्ट सगळ्या कडचे चौक्या आणि भाईंदर शहरातल्या चौघूले आहेत जेवढे कॉर्नर आहेत तेवढे चौघूले ते चेक करा आणि तिकडचे जे स्टीकर आहे ते चेक करा. तुम्ही आम्हाला काय सांगता. तुम्ही पोजिटीव्ह बोला.

**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी पॉझिटीव्हच बोलतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची दरवेळेला रडपट्टी असते. १००, १०० गायी रस्त्यावर फिरत असतात. तुम्ही लोक गायी पकडत नाही. जावून पोलवानाचा रिपोर्ट बघा. एक गाय पकडली तर २००० रू. चा इनकम आहे. १५ कर्मचाऱ्यांचा स्टाफ आहे. तुमच्याकडे गाडी आहे. ड्रायव्हर आहे. सगळ आहे. तुम्ही आम्हाला काय सांगता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शहराचे जे मुख्य रस्ते आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कोंडवाड्यावर ९ लाख रू. खर्च केले. ते अजुन रिकवर झाले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
ज्या जाहिराती होतात त्याचा पैसा महापालिकेला पाहिजे आणि ते गेल्यानंतर ती जाहिरात रहायला नाही पाहिजे. ह्या दोन तीन बाजू प्राधान्य पाहिजे.
**मा. सभापती :-**
आपल्या चार ही प्रभागात जाहिराती आहे ना....
**ज्योत्स्ना हसनाळे :-**
साहेब, तुम्ही आत बोलला ना. ते बरोबर आहे. पण त्यांच्याकडे कधीपण गेले तर त्यांच्याकडे एकच उत्तर देतात की, आमच्याकडे स्टाफ नाही. हे उत्तर त्यांचे असते.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
जाहिरातीसाठी स्टाफ चे नियोजन केले जाईल.
**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
मा. सभापती साहेब, प्रभाग अधिकाऱ्यांना अधिकार नाही.
**मा. सभापती :-**
मी सांगतो. ह्या चार ही प्रभागामध्ये जाहिरातीचे चार अधिकारी पाहिजे.
**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
त्या अधिकाऱ्यांना अधिकार देवून टाका.
**मा. सभापती :-**
आम्ही सगळे नगरसेवक चार ही अधिकाऱ्यांकडे जावून आपल्या तक्रारी जावून सांगू शकतो. तिकडे फलक लागलेला आहे. तर पैसे भरले की नाही त्याची कॉपी बघून......
**मिलन म्हात्रे :-**
साहेब, तुम्ही नगरसेवकांवर ढकलू नका त्याच्यात राजकारणात भांडणे होतील. आपण अधिकाऱ्यांना गाड्या दिलेल्या आहेत. प्रभाग अधिकाऱ्यांनी डायरी घेवून बाहेर निघायचे कुठेही जे काही निघण्यासारखे स्टीकर असतील. ते काढा त्याचा पंचनामा करा म्हणजे ते ह्या एका सार्वजनिक ठिकाणी लागले होते.
**मा. सभापती :-**
तुम्ही कंप्लेंट करा. जर त्याच्यावर ॲक्शन झाली नाही.
**मिलन म्हात्रे :-**
आणि कंप्लेंट कोणी केलीच नाही तर......
**ध्रुवकिशोर पाटील :-**
वॉर्ड ऑफिसरचा काम काय? साहेब, एवढासा वॉर्ड आहे. त्यांनी जर एक तास फेरी मारली तर वॉर्ड ऑफिस.....
**मिलन म्हात्रे :-**
फोटो काढा, कॅमेरा घ्या, व्हीडीओ शुटींग काढा.
**मा. सभापती :-**
चारही प्रभागाला देतो त्यासाठी सांगतो.
**संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
तसा प्रपोझल द्या.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
साहेब, मी तुम्हाला सांगितले गाय पकडणार आहे. हे सदस्य जे बोलले की, तुमच्याकडे आज १५ कर्मचाऱ्यांचा स्टाफ आहे. तुम्ही दुसऱ्या गायी किती पकडल्या ते मला सांगा? तुम्ही किती मोकाट गायी किती पकडता?
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**
मोकाटपणे ज्या गाई फिरतात त्याची कार्यवाही मी करतो.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
तुम्ही आता फोन करा आणि विचारा की, कालच्या दिवशी किती गाई पकडता?
**ज्योत्स्ना हसनाळे :-**
पानपट्टे साहेब, रस्त्यावर गाई बसलेल्या असतात. शेवटी आपल्याला गाडी अशी कशीबशी न्यावी लागते. आम्ही तुमच्याकडे येतो तेव्हा तुमच्याकडे स्टाफ नसतो, गाड्या नसतात. अशी उत्तरे येतात. मग, तुम्ही बोलता की, ते चुकीचे बोलत नाही.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
साहेब, तुम्ही एक काम करा. आता एका क्लार्कला पाठवा. आणि तुमचा स्टाफ काय करतो त्याचा लगेच रिपोर्ट घ्या. काहीच करत नाही. फक्त टी.व्ही. बघत असतात आणि पत्ते खेळत असतात.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, माझ्या माहितीनुसार बारा पैकी चार लोक तर दारु पिउन टाईट असतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही आम्हाला सजेशन देतात.

**एस. ए. खान :-**

त्यांची बदली करा ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही आता येथे जे बोलले ना की, ज्यांना कार्यतत्पर नाही. त्यांना हेड ऑफीसला घ्या. आम्ही तुम्हाला दुसरे कर्मचारी त्यांच्या जागेवर देउ.

**मिलन म्हात्रे :-**

मा. खतगावकर (उपायुक्त) साहेब, मागच्या वेळेला एक भय्या किटली घेवून आला. आम्ही गाई बघायला गेलेलो. तो भय्या किटली घेवून आला आपल्या कोंडवाड्यातून दारासमोर चढला. आतमध्ये गेला आणि किटली भरुन दुढ काढले. गाय आतमध्ये होती. त्या गाईला आपण खायला घालतो. तो परत आला किटली उचलली आणि सरळ निधून गेला. त्याला विचारले की, हा काय प्रकार आहे? तर तो म्हणाला की, दुध नाही दिले तर माझी गाय मरेल. ही परिस्थिती आहे. म्हणजे आपण दोन पैशाचा चारा टाकायचा आणि ज्याची गाय पकडली त्याने येउन दुध काढून जायचे. तुम्ही त्या गाईला तीन दिवस पोसायचे इतर कर काय प्रकार आहे.

**एस. ए. खान :-**

जाहिरातीचे आपल्याला १४ लाख रु. ची डिमान्ड होती का? तर, वसुली किती झाली?

**मिलन म्हात्रे :-**

इतर कर म्हणजे काय?

**शानु गोहिल :-**

पाणपट्टे साहेब, १४ लाख रु. पेक्षा वसुली किती झाली?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तात्पुर्ती वसुली असते ना. तत्पुर्वी होल्डिंग्ज दिलेले असते ना. आपण तात्पूर्ती स्वरुपाचे होल्डिंग्ज देतो ना. त्याच्यामध्ये इतर कर.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी जे आता स्टीकर बद्दल बोललो ना. होल्डींग्ज कॅलेन्डर असतात ती. त्यानंतर पिच्चरची पोस्टर्स. ही सगळी त्या इतर करामध्ये येतात. तुम्ही जी वसुली केलेली नाही. साहेब, मी चुकीचे बोलतो का ते मला बोला. ते इतर करमध्ये आले पाहिजे.तुमची जी कारवाई करत नाही. तुम्ही कार्यवाही करु शकता.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, इतर जे पोस्टर्स लागतात. आपल्या रस्त्यावर जे नामफलक आहे. त्याच्यावर देखील पोस्टर्स लावतात. तर, तुम्ही त्याच्यावर काय कार्यवाही करता?

**तुळशिदास म्हात्रे :-**

ते जावू द्या.

**शरद पाटील :-**

ते कशाला जावू दे.

**तुळशिदास म्हात्रे :-**

जाहिरातीने जे थांबे बनवले त्याच्यावर सुध्दा आपल्या लोकांनी कटआउट लावलेले आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, कसे असते की, त्यांना कमाई ठेक्याने दिलेली असते. तर त्याच्यावर कुठले होर्ल्डींग्ज लावायचे ते ठेकेदार ठरवणार.

**मिलन म्हात्रे :-**

ठेकेदार तुमचे पैसे भरतो. त्याच्यावर तुमचे पदाधिकारी राजकीय जावून बॅनर लावून टाकतात. त्या लोकांनी वर्षभराचे पैसे भरलेले असतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

होर्ल्डींग्ज सांभाळण्यासाठी त्याचे वैयक्तिक लोक असतात.

**मिलन म्हात्रे :-**

असे कसे? त्यांनी तक्रार करुन सुध्दा तुमच्या लोकांनी ते काढलेले नाही. ते महत्वाचे आहे. येथे आपले मा. सभापती साहेब बसलेले आहे ना  त्यांनीच काही होर्ल्डींग्ज काढली. त्यांना विचारा.

**मा. सभापती :-**

आपण कोण आहे त्यांचे होर्ल्डींग्ज काढायचा?

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या येथे पाली हिल रेसॉर्टचे जे बोर्ड लागलेले आहे ना त्याच्यावर सुध्दा होर्ल्डींग्ज लागलेले आहे.

**मा. सभापती :-**

मी माझे होर्ल्डींग्ज काढतो.

**मिलन म्हात्रे :-**

ती नाही. बाहेरची. तुमचे हॉटेलचे आहे ना. त्याच्यावर दुसऱ्याचे लागतात.

**मा. सभापती :-**

मी काढली.

**एस. ए. खान :-**

पाणपट्टे साहेब, तुम्ही सांगितले नाही की, आपली १४ लाख रु. ची डिमांड आहे. तर वसुली किती झाले?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, एक-दोन चांगले विषय आहे. ते जे होर्ल्डींग्ज आहेत. फ्लायओव्हर ब्रिजवळ जाताना आणि उतरताना जी कमानी लागेल. त्या कामानीची परमिशन कोणी दिली. कधी दिली? आणि त्याचा टॅक्स किती वसुल होतो? कारण जाहिरातीचे म्हणणे आहे की, ही परमिशन त्यांनी दिलेली नाही. बांधकाम विभाग बोलते की, हे जाहिरात विभागाने बघावे. आणि त्याचा टॅक्स पण एवढा कमी आहे.

**तुळशिदास म्हात्रे :-**

माझ्या गावात पण कमानी बांधलेली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पी.डब्लु.डी. कडून कार्यवाही झालेली आहे. आम्ही फक्त जाहिरात कर त्या संदर्भात वसुल करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पी.डब्लु.डी. ची परमिशन कोणाच्या आधाराने व कधी दिली?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

स्टॅन्डीगच्या ठरावानुसार दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कधी दिली? आणि स्टॅन्डीगला तो अधिकार आहे का?

**एस. ए. खान :-**

गावी छोट छोटे कमानी जे लावतात त्याच्यावर पक्षाचे नावे असतात.

**मिलन म्हात्रे :-**

आपका जाहिरात का बाकी है क्या? फिर उसको पूरा करो ना?

**एस. ए. खान :-**

कमानी किती आहे?

(श्री. संभाजी पाणपट्टे यांनी स्थायी समिती सभा दि. ३१/०५/२००४ मधील ठराव क्र. ९ च्या ठरावाचे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

या ठरावामध्ये काय दिले त्यांनी मागण्या केली. त्यांना तुम्ही परमिशन देवून टाकली. एखादा माणूस एखादी वस्तु बनवतो तर त्याचा बेनिफिट तर घेणार ना. आता तुम्ही त्याच्यात मान्यता स्वखर्चाने दिली असा शब्द आहे. तर आम्ही त्याचा अर्थ काय समजायचा? एका ठरावामध्ये तुम्ही एका व्यक्तीला दिले. त्यांनी सगळे कवर केले. म्हणून तुम्हाला विचारले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दोन दिलेले आहे. तुम्ही त्याच्यामध्ये नीट वाचा. त्याच्यामध्ये काय म्हटले ते वाचा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

त्याच्यामध्ये हे म्हटलेले आहे की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका किंवा ठाणे महानगरपालिकेमध्ये असे कमानी आहेत. त्या धर्तीवर आपल्या शहरात कमानी मिळायला पाहिजे. त्यांनी वाचलेले आहे ते मी सांगतो. आणि यामध्ये आपण दिशादर्शक करण्यासाठी स्वतःच्या कमानी खर्च आला असता. तर ते प्रायव्हेटने करुन घ्यायचे म्हणजे पैसे बचत होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मला सांगा आता त्यांनी दिशादर्शक लावले का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

एस्सलवर्ल्डला लावलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एस्स्लवर्ल्डचे नाही. मी फ्लायओव्हर ब्रिजची गोष्ट करातो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मागच्या साईडला लावलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

लावलेले आहे. साहेब, आता काढा आणि मनोहर म्हात्रे यांना जावून बघायला सांगा. आणि जर लवले असतील तर मी नगरसेवक पद सोडतो आणि नंसेल तर तुमच्यावर ॲक्शन घ्यायला सांगतो. साहेब, तुमच्याकडे काय करतात? त्यांनी दिशादर्शक लावलेले नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

लावलेले आहे. पण प्लेट छोटी आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पाणपट्टे साहेब, तुम्ही नेहमी जाता आम्ही पण नेहमी जातो. तुमचे लक्ष नसते पण आमचे लक्ष असते. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचे ताशे ओढतात ना ते ह्याच्यामुळेच. साहेब, हा ठराव चुकीचा झालेला आहे. त्याच्यामध्ये अजिबात म्हटलेले नाही. तुम्हाला जाहिरातीचे उत्पन्न किती येते?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महासभेमध्ये जेव्हा एस्सलवर्ल्डचा ठराव आला तेव्हा सर्व कमानी कॅन्सल करायला सांगितलेल्या आणि अजून सर्व कमानी कॅन्सल करायचे आणि सर्वात महत्वाची गोष्ट परवानगी द्यावी किती काळासाठी त्याचा उल्लेख नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. आयुक्त साहेबांना अधिकार दिलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पुढीलसाठी अधिकार दिलेले आहे. ह्या कमानीसाठी नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब ही कमानी बांधून दोन-दोन वर्ष झाली. शेवटी त्यांनी खर्च केला दोन लाख रु. चा आणि त्यांनी ठेका घेतला १०० वर्षाचा आणि मा. महासभेच्या ठरावमध्ये सर्व कमानी काढायला सांगितलेल्या आहेत. असा मा. महासभेमध्ये ठराव झालेला आहे.

**तुळशिदास म्हात्रे :-**

आपण ठराव घेउ शकतो. तुम्ही विषय आणा.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य तुळशिदास म्हात्रे साहेब, मा. महासभेमध्ये ठराव झालेला आहे की, कमानी काढा म्हणून. हा ठराव स्टॅन्डीगचा आहे. पण मा. महासभेत ठराव झालेला आहे की, त्यांनी तिथे सर्व भंगार लावून ठेवलेला आहे. असा विषय झालेला आहे की, भंगार लावून ठेवलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खतगावकर साहेब, साहेबांनी जी माहिती दिली ती चुकीची माहिती दिलेली आहे. त्याच्यावर दिशादर्शक अजिबात लावलेले नाही. आणि दुसरी गोष्ट तुम्हाला उत्पन्न किती येते?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्या होर्ल्डीगचे ३२ हजार रु. येते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आणखीन दुसरी गोष्ट, हा ठराव झाला २००४ ला. त्यांची कमानी आता उभी राहते. तर ती एवढी लेट उभी का राहिली?

**मा. सभापती :-**

एक दिड वर्षे झाले कमानी लावलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, वेस्टला आता उभी राहिलेली आहे आणि ईस्टला आता ......

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

ह्या एका होल्डिंगमधून वार्षिक उत्पन्न १२,०००/- रु. आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कुठल्या?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

आताचे ब्रिजवरचे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आणि मागची साहेब तुम्ही सन २००४ ला ठराव केला मग आता २००७ झाले. अजून इम्प्लिमेंटेशन का झाले नाही? एवढे लेट का झाले? त्याचे पैसे अगोदर पासून वसूल करा ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, पी.डब्ल्यू.डी. कडून परवानगी दिली जाते. आणि आम्हांला फक्त जाहिरात कराबद्दल सुचना दिलेल्या आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खतगांवकर साहेब हा जो ठराव झालेला आहे. त्या ठरावाच्या हिशोबाने ती होल्डिंग लागलेली नाही. आणि ह्या लोकांनी पण होल्डिंग लावल्यानंतर ठराव काय झाला. त्या संदर्भामध्ये त्या संबंधात त्या लोकांनी बोर्ड लावलेले नाही. दिशादर्शक पण लावलेले नाही. तर ह्यांच्यावर कार्यवाही का करु नये? आणि त्यांनी लेट का केले? २००४ ला ठराव झाला होता आता सन २००७ झाले. तीन वर्षे लेट का झाले? आणि ह्याच्यामध्ये कालावधी पण नमुद नाही म्हणजे आज आपण होल्डिंग लावू शकतो का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हे बांधकाम विभागाकडे दिलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. आयुक्त साहेबांकडे जाहिरात विभाग आणि बांधकाम विभाग यांची संयुक्त बैठक होवून एकूण होल्डिंगला किती खर्च आला? त्याला आपण राईट किती कालावधीसाठी दिलेले आहेत. आणि आपल्याला त्याच्यातून उत्पन्न वार्षिक खर्च किती होते? आणि त्याचा ठेका कोणत्या कालावधी संपूष्टात येणार आहे आणि जे दिशादर्शक फलक लावायला पाहिजे त्याच्या जागा कोणत्या आहेत? ह्या सगळ्याबाबत निर्णय घेवून येणाऱ्या सभेत माहिती देउ.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचे व्हॅल्युएशन किती आहे? तो दहा लाखाचे बजेट होईल आणि तुमच्याकडे कमी दाखवेल.

**तूळशीदास म्हात्रे :-**

व्यक्ती कुठली आहे? ती व्यक्ती शहरातली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

संयुक्त चर्चा करु. मागणी करणारे कोण आहे? शहरातले आहे की बाहेरचे आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शहरातले आहे.

**एस. ए. खान :-**

साहेब, त्याच्यामध्ये हे पण पाहून घ्या की, त्यांनी जे अँगल वगैरे जे वापरले ते जूनं आहे. इस्ट्रक्चरल इंजिनियर को सर्टिफिकेट पाहिजे ना. साहेब कोणाच्या अंगावर पडला तर प्रॉपर बनवले की नाही ते बघायला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तुम्हांला माझी विनंती आहे. हा ठराव आपण परत रिस्ट्रक्चर केले. तर आपल्या महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, त्यात दोन गोष्टी आहेत. आपण आता ह्या स्टँडींग मध्ये बसलेलो आहे जाहिराती बद्दल मी नंतर बोलतो. पहिला हि गोष्ट जे जे निर्णय मा. सभापती साहेबांनी दिलेले आहे किंवा खतगांवकर साहेबांनी जे आदेश दिलेले आहे. पुढच्या वेळी ते आदेश आमच्याकडे लिखित स्वरूपात आले पाहिजे. म्हणजे किती वर्षात केले ते कळेल. मा. सभापती साहेब, बोलले. काढून टाकू. साहेबांनी सांगितले मिटींग घेवू. ती मिटींग होत नाही म्हणून पुढच्या स्टँडींग मध्ये आज जे जे आदेश मा. सभापती साहेबांनी. दिलेले आहे. ते आदेश ह्या तारखेला ह्या डिपार्टमेंटला गेले असे आम्हाला टिपणी पाहिजे. साहेब, हे मिनिटस आहे. आम्ही प्रभाग समितीमध्ये होतो. तेव्हा असे विषय होते की, हे आदेश ज्या मिटींग मध्ये द्यायचे. ह्याची एवढी पुर्तता झाली आहे नाहीतर मिनिट्स मिनिट्स आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मा. सभापती साहेब रूलिंग देतात त्यांचे आपण पर्सनली टिपणी देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्टँडींगमध्ये जे ठराव आहे त्याच्यावर इम्प्लिमेंट व्हायला पाहिजे. तर ते इम्प्लिमेंट अजुन झालेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

इम्प्लिमेंट न होणे म्हणजे.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

बँकेचा ठराव झालेला आहे. असे तुम्ही आता बोलले अतिक्रमणाचा ठराव झालेला आहे. मी तुम्हाला ठराव देतो. त्या एकाही ठरावावर इम्प्लिमेंट झालेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेमध्ये रूलिंग देतात.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्टँडींगमध्ये जे रूलिंग देतात ते रूलिंग मा. सभापती साहेब देतात. संबंधित खातेदाराला त्या दिवशीची नोंद पाठवलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

रूलिंगची एक नोंद पाठवा ना.

**मिलन म्हात्रे :-**

ते प्रोसिडींगमध्ये सुद्धा येते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सचिव साहेब आपण रूलिंग सोबत पाठवतो ना.

**नगरसचिव :-**

नाही पाठवत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब पुढच्या मिटींगमध्ये सदर विषय ठेवण्यात यावा. पण ठेवला जात नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

आपले म्हणणे हे आहे की, व्हॅल्युएशन होत नाही. फक्त चर्चा होते.

**मिलन म्हात्रे :-**

४१ की ४२ विषय आहे. ते गेल्या पाच वर्षापासुन सगळे उडालेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून एक पद्धत तरी लावा. दुसरी गोष्ट जाहिरात बद्दल मी बोललो. होल्डींगचा नंतरचा विषय आहे. आता तुम्ही जाहिरातीमध्ये आणि होल्डींगमध्ये १९ लाख रू. ची वसुली दाखवली. जर तुम्ही ह्यामध्ये १९ लाख रू. वसुली दाखवायचे तर एकूण जाहिरात कुठल्या साईडचे आणि किती? मिरा भाईंदरमध्ये १९ लाख रू. कुठल्या बेसवर....

**मा. सभापती :-**

आपण जाहिराती देतो ते लावतात. न बोलता त्याची रूंदी आणि लांबी घ्यायला पाहिजे. कुठे कुठे मोठी लावतात तिकडे काही मागचे पुढचे दिसत नाही. ट्रॅफिकला अडचणी होतात. लांबी रूंदीची साईज कोणी मोठी लावली ताबडतोब काढावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही आता जाहिरातीची १९ लाख रू. ची मागणी दाखवली.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हा जो ठराव आहे ना हा टोटल वन साईड ने झालेला आहे. हा ठराव रद्द करा आणि पुढच्या मिटींगला व्यवस्थित आणा. साहेब, हा ठराव रद्द करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

ठराव रद्द करण्यासाठी प्रोसिडींगवर घ्यायला लागते.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे. कसे असते ते मी तुम्हाला सांगतो. मा. स्थायी समिती सभा दि. २१/०५/२००४ चे प्रकरण क्र. ७ ठराव क्र. ९ आहे. तुमचा पहिला विषय तो येईल की हा ठराव आपण व्यापगत करायचे की कॅन्सल करायचे. कारण सदर ठरावामध्ये कालमर्यादा दिलेली नाही. आर्थिक येणे समोरच्या व्यक्तीचा किती खर्च झालेला आहे. त्याच्यासमोर महापालिकेला किती उत्पन्न आहे ते दिलेले नाही. त्या कारणासाठी कालावधी किती उत्पन्न आहे ते दिलेले नाही. त्याकरणासाठी कालावधी संपूष्टात येण्याचा कालावधी आणि तसेच सदर ठराव झाल्यापासुन ३ वर्षापासुन हे कामाला सुरूवात केलेली नाही. इतर कामामध्ये तुमच्या तीन महिन्याची दोन महिन्याची एक महिन्याची कालमर्यादा असते. ती उल्लंघन झाल्याकारणाने आम्ही हा ठराव रद्द करत आहोत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

हे प्रस्ताव करण्यासाठी प्रशासन सादर करेल. त्यावेळी चर्चा होईल.

**मिलन म्हात्रे :-**

पण हे मुद्दे आले पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता मी जाहिराती बद्दल बोलत होतो. १९ लाख रू. ची मागणी दाखवलेली आहे. तर, १९ लाख रू. ची मागणी दाखवताना.....

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**

जाहिराती बद्दल सांगतो. ठराव क्र. ९ होताना त्या संदर्भात सविस्तर रेफरन्स घेवून सविस्तर प्रस्ताव स्टँडींगमध्ये येतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जाहिरातीत तुम्ही १९ लाख रू. ची मागणी केलेली आहे. त्यामध्ये कशा कशा पद्धतीने १९ लाख रू. येणार आहे. त्याची माहिती जरा जरा द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जाहिरातींवर जाहिरात असे १२ लाख रू. कसे असते की, बालाजी स्टोर त्याच्यावर नोकियाची बोर्ड लावतात. बालाजी स्टोर्स चे जाहिरात लावत नाही. नोकिया बोर्डला लावतो. त्याला म्हणतात जाहिरातींवर जाहिरात जी करते त्याच्यावर आपण प्रत्यक्ष सर्व्हे करतो. दरवर्षी सर्व्हे करतो. दरवर्षी सर्व्हे केल्यानंतर आपल्याला ज्या काही जाहिराती आढळल्या त्याची मागणी करतो. त्यांना बिल पाठवतो मग वसुल करतो आणि ज्या ज्या ठिकाणी आपल्याला काही आढळते तेथुन १०० टक्के वसुली होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही त्यांना १९ लाख रू. चे ब्रेक अप सांगा. साहेब तुम्ही चर्चा करा चर्चा करण्यापुर्वी त्यांनी एक मुद्दा अर्धवट सोडला तर त्यांना १९ लाख रू. चा ब्रेकअप सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जाहिरातींवर जाहिरात असे १३ लाख रू. आणि दुसरे तात्पुरती होल्डींग्ज. आपण तात्पुर्ती होल्डींग्ज साठी ८ दिवसाची महिना भराची परवानगी घेतात. त्याचे अंदाजित ५ लाख रू. आहे. डिवाईडर चे ५६ हजार रू.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला येथे डिवाईडरचे वाढवता येतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही जाहिरांतीवर जाहिराती सांगितले श्री. बालाजी जनरल स्टोर्स याला तुम्ही जाहिराती कर लावत नाही असे तुमचे म्हणणे आहे. मी तुम्हाला आणून दिले तर भाईंदर मध्ये असे पन्नास हजार सदनिका आहेत. फक्त दोन बाय दोन फुटाचा बोर्ड लावण्याचे महापालिका पैसे वसुल करणार.

**मिलन म्हात्रे :-**

आठ बाय दोन माझ्या दुकानाचा सर्व्हे झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्यावर्षी सर्व जाहिरातीवर तुम्ही कर आकारणार असा ठराव झालेला आहे. मग तुम्ही सांगा जाहिरातीवर जाहिरात असे बोर्ड नाही का? एक उदा. देतो विणा होटेल, किती मोठा बोर्ड आहे. ह्याची जाहिरात नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महासभेने ठराव केलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही चुकीची माहिती देतात म्हणून सांगितले तुम्ही ही आंधळे नाही आणि आम्हीही आंधळे नाही. साहेब, तुम्ही जे १४ लाख रू. दाखवतात ना हे १४ लाख रू. किमान ५० हजार सदनिका दुकानदाराकडे आहे आणि आठ बाय दोन पेक्षा जास्त सर्वांचे बोर्ड आहे. प्रत्येकाला नोटीस गेलेली आहे. मालक अगदी पैसे भरतो. मी पैसे भरतो. कंटीन्यु मागणी आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांचे म्हणणे काय आहे की, ज्याचा स्वतःचा व्यवसाय आहे किंवा दुकान आहे त्याला स्टँडर्ड जाहिरात आपण फ्रि सोडलेली आहे. त्यांना सुद्धा तुम्ही नोटीस दिलेली आहे. असे त्यांचे म्हणणे आहे. साहेब त्याच्यावर आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही केले ना वकीलांकडून वसुली होणार नाही. ह्यांची वसुली कमी आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांचे म्हणणे काय की, ज्या जाहिराती आहेत त्या जाहिरातींवर कोणी लावत असेल तर सर्वांना नोटीस जायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही कन्फ्युज करू नका. श्री. बालाजी जनरल स्टोर्स त्याच्यावर एअरटेल ची जाहिरात लावली त्याच्यावर जाहिरातीचा कर लावला. पण बालाजी जनरल स्टोरला दोन बाय आठ ची परवानगी आहे. त्यांनी बांधले सहा बाय आठ चा त्याला लागू आहे की नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

स्टँडर्ड जाहिरात ही मोठी जाहिरात असेल तर त्याचा प्रस्ताव आणा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आम्ही पुर्ण सर्व्हे करणार आहोत. त्याचे आपल्याला रेट रिवाईज करायचे आहे. कुठे कुठे नविन रस्त्यामध्ये होल्डींग्ज लावतात. त्याचा सविस्तर अहवाल मी मा. महासभेला आणणार आहोत.

**शानु गोहिल :-**

पानपट्टे साहेब, टोटल होल्डींग्ज किती आहेत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
१८१ आहे.
**एस. ए. खान :-**
त्यामध्ये बेकायदेशिर किती आहे?
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
बेकायदेशिर नाही.
**शानु गोहिल :-**
त्याच्यामुळे आपल्याला टोटल इन्कम किती येते?
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
पर्टीक्युलर प्रमाणे सांगता येणार नाही. तीस लाख आहे.
**एस. ए. खान :-**
आठ कमानी आहेत का?
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
हो आठ कमानी आहेत.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
मग ठेका होल्डिंग्ज म्हणजे काय? ते कीती आहे?
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
ठेक्याने होल्डिंग्ज देतो ते त्याची मागणी ३० लाख रू. आहे.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
माजी सभापती साहेबांच्या गावामध्ये कमान आहे. त्यांना टॅक्स लावा ना. ती विदाउट टॅक्सची कमान आहे. त्यांना टॅक्स लावून टाका.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
तत्पुर्वी होल्डिंग्ज समारंभासाठी घेतली असेल तर ती गोष्ट वेगळी आहे.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
तत्पुर्वी असेल ती कारण परवानगी घेवून त्याचे पैसे वेगळे असतात. तो जाहिरातचा विषय येतो. कमानीचा विषय वेगळा आहे. कमानीचे रेट्स वेगळे आहे.
**शानु गोहिल :-**
आपणटॅक्सला जाहिरात करतो. तर त्याच्यासाठी किती खर्च होतो.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
त्याचे मला माहित नाही.
**शानु गोहिल :-**
जाहिरात टॅक्स भरण्यासाठी देते ना. तर त्याच्यात किती खर्च येतो.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
टॅक्सचे बिल मला माहित नाही.
**शानु गोहिल :-**
टॅक्स चे बिल नाही. आपण जाहिरात लावतो ना. बोर्ड लावतात ना. त्याचा किती खर्च येतो? ते मी तुम्हाला विचारते.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
त्याची भांडार विभागाकडे माहिती आहे.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
त्याला जाहिरात टॅक्स लागेल.
**शानु गोहिल :-**
त्याचा खर्च किती येईल ते मी विचारते? बोर्ड किती लावले?
**एस. ए. खान :-**
जे बोर्ड लावलेले आहे ते किती लावलेले आहे.
**शानु गोहिल :-**
संपूर्ण मिरा भाईंदर मध्ये बोर्ड लावतो. त्याला खर्च किती येतो. माझ्या एरियामध्ये चार आहे.
**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
आपण एकूण बोर्ड साधारणतः किती लावलेले आहे. त्यांनी पहिले १०० बोर्ड लावले होते. विभागाची मागणी ३०० बोर्डची होती. तुमचे म्हणणे किती आहे? जास्त बोर्ड आहे की कमी? त्याला बोर्ड लावण्यासाठी किती खर्च झाला.
**मिलन म्हात्रे :-**
त्याचे काम कितपर्यंत आले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ठेक्याचे होल्डिंग्ज १८१ आहे. त्याचे ३० लाख रू. आपल्याला डिमान्ड आहे.

**मिलन म्हात्रे :-**

डिवाईडर चे काय झाले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, डिवाईडरचे ५६ हजार रू. आहे.

**एस. ए. खान :-**

आणि कमानीचे किती?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

कमानीचे २ लाख १० हजार रूपये.

**तुळशीदास म्हात्रे :-**

एकुण कमानी किती आहे?

**राजन लाकडे :-**

चार पकडलेल्या आहेत. त्यातल्या एस्सेल वर्ल्डला ज्या चार आहेत त्याचा अजुन निर्णय लागलेला नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

त्याच्यावर मा. महापौरांची जाहिरात लागलेली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण पैसे वसुल करतो. आपण त्या बोर्डाचे पैसे वसुल करतो.

**एस. ए. खान :-**

कमित कमी आपला हा लुक आउट आहे. ते बरोबर बांधलेले आहेत की नाही. कधी पडतील काय ते?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ती जबाबदारी ठेकेदारांची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जे म्हणतात ना ते १०० टक्के सत्य आहे. साहेब एकदा काय झाले ते मी तुम्हाला सांगतो. रस्त्याची अर्धी बाजु त्याच्यातला अर्धा बॅनर आणि त्याला काठी लागलेली होती. आणि ते मेन रोडवर उडत होते. म्हणजे एखादा टू व्हिलरने चालला असेल. एखाद्याचे एक्सीडन्ट झाले तर त्याची जिम्मेदारी कोणाची? तिथे पुर्ण दिवसभर लटकत होते. आणि एकाही अधिकाऱ्याचे लक्ष नाही. कोणाची काढायची वृत्ती नाही आणि आम्ही पण काढू शकत नाही. प्रशासन उद्या माझा जरी असला आणि मी बाहेरगावी गेलो. माझे लक्ष नाही तर तुम्ही ते काढून माझा दंडात्मक रक्कम द्यायला पाहिजे.

**एस. ए. खान :-**

होल्डिंग्ज चे इन्श्युरन्स वगैरे काढतात ना. तर तुमच्यामध्ये काहीही नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही होल्डिंग बांधून मोकळे झाले. जर उद्या एखादी होल्डिंग्ज कोसळली आणि दोन चार माणस मेली तर ती मिरा भाईंदर महानगरपालिकेची......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण कमानी बाबत निर्णय केला ना.

**मिलन म्हात्रे :-**

भाईंदर पश्चिम येथे ज्या ज्या वेळेला पावसाळ्यामध्ये वादळी वारे सुटतात. तुमची मोठी मोठी होल्डिंग्ज कोलमडून पडलेली आहे. स्टेशन जवळ हे वास्तव आहे. तर ते जे इन्श्युरन्सचे म्हणतात ना त्याच्याबद्दल काय करता ते बघा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्यात जर काही अपघात झाला काही दुःखापत झाली तर ती जिम्मेदारी ठेकेदाराची राहील ना.

**मिलन म्हात्रे :-**

इन्श्युरन्स काढल्याशिवाय त्यांना ते द्यायचे नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता आपण नविन प्रस्ताव करणार आहे ना. तर ह्या बाबीचा त्याच्यात समावेश असावा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नमुद केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, नमुद केले पण त्यांनी इन्श्युरन्स काढला का? गाडी, घेताना इन्श्युरन्स असावे हे नमुद असते. पण त्यांनी इन्श्युरन्स काढला का? परिवहनच्या बस चालल्या. त्या ॲग्रीमेंटमध्ये आहे पण प्रत्येक बसचा इश्युरन्स ॲक्सीडेंटचा काढावा. काढल्या की नाही ते जरा बघा ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ट्रान्सपोर्ट, वाहन विथआउट इश्यूरन्स रोडवर चालू शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

चालते. भाईंदरमध्ये २० गाडया आहे. स्ट्रेस कॅरेस परमिशन शिवाय ६ महिने चालल्या. तुमच्या माहितीच्या अधिकाराचे माझ्याकडे उत्तर आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रायव्हेट गाडया असतील.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या आस्थापनेत आहे. तुमच्या महापालिकेच्या सर्व्हिसमध्ये आहे. मी पत्र पाठवल्यानंतर तुमचे स्ट्रेस कॅरेस परमिट लागले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण कुठल्या ठिकाणी देत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची नाही. पण ते रस्त्यावर आले ना. मी सांगतो माझ्याकडे रायटींगमध्ये आर.टी.ओ. चे आहे. साहेब मी बोलताना कागद ठेवून बोलतो. माझे पत्र गेल्यानंतर तो आर.टी.ओ. वाला जागा झाला. आपल्या भाईंदरला २० गाडया परमिट शिवाय आल्या. ६ महिने चालल्या. माझ्याकडे ते पत्र आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तपासून पाहतो.

**मिलन म्हात्रे :-**

बघा. तुमच्याकडे परिवहन होते.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब तुम्ही असे ॲग्रीमेंट करु नका. मी जे बोलतो ते ऐका. कॉन्ट्रक्ट फॉर डिसप्ले ऑफ ॲडर्व्हटाईजिंग ऑन दी होल्डिंगस् विल बी ऑपरेटेड बाय दी कॉन्सेशनरी फॉर दी पिरीएड ऑफ वन इयर लाईटली टू बी एक्सटेन्डेड ऑटोमेटीकली अप टू ५ वॅट इज मिनिंग ऑफ ऑटोमेटीकली?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

स्थायी समितीने ५ वर्षाचा ठराव केलेला आहे. त्याच्यामध्ये लिहिलेले आहे.

**एस. ए. खान :-**

काय लिहिलेले आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

पाच वर्षाचा ठराव केला ना.

**एस. ए. खान :-**

वन इयर लिहिलेले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याला रिन्यूव्ह केलेले नाही. ठेका दिलेला आहे. त्याला रिन्यूव्हची गरज नाही.

**एस. ए. खान :-**

रिन्यूव्हची का गरज नाही. त्यांनी अटीशर्तीचे उल्लंघन केले तर रिन्यूव्हची का गरज नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ज्यावेळेला ठराव केला होता त्यावेळेला तुम्ही नव्हता. मी सुद्धा नव्हतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब कुठची गोष्ट अकरा महिन्यावरती देत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या लेव्हलचा आहे ना. त्याची दुरुस्ती करायला पाहिजे.

**एस. ए. खान :-**

आमचे ही म्हणणे हे आहे की दुरुस्ती करुन घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांनी काय सांगितले की आपल्या फेरविचाराविषयी ॲक्सेप्ट करा तर तुम्ही ते ॲक्सेप्ट का करत नाही?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

कोणाचे फेब्रुवारी २००८ मध्ये कोणाचे एप्रिलमध्ये संपेल ना.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मला एक सांगा, तुम्ही वर्षाचे लिमिट दिले ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब माझी अशी अपेक्षा नाही. कोणत्याही गोष्टीत काय असते की, एखादे ॲग्रीमेंट करताना त्यावेळेच्या परिस्थितीत आपण ॲग्रीमेंट करत असतो. आणि त्याच्यात अजून काही सुधारणा होतात. आपल्याला त्याच्यातले बारकावे समजतात आणि ते काही अटीशर्ती आहे ना. त्याच्यात सुधारणा होणे अपेक्षित आहे. असे सदस्यांची सुचना आहे तर आपण त्याच्यात सुधारणा करु.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पानपट्टे साहेब आपण पाच वर्षासाठी देतो. विचार करण्यासारखी गोष्ट आहे. दिवसेंदिवस सगळ्या गोष्टीचा भाव वाढत चाललेला आहे. मग, त्याच्या होर्डिंगचा आपण ठेका पाच वर्षाचा घेतलेला आहे. मग, आपण ते कधीही कॅन्सल करु शकतो. तुम्ही ते कॅन्सल करुन टाका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

खतगांवकर साहेब, तुम्हांला महत्त्वाची गोष्ट सांगतो ए.टी.पी. बसलेलो आहे. पानपोई बांधली. पाणपोई कशासाठी बांधली. लोकांना पाणी पिण्यासाठी त्याची मुद्दत अकरा महिने आहे. आर.सी.सी स्ट्रक्चर असे तीन पाणपोई बांधण्याचा प्रस्ताव मागे घेतला होता. ११ महिन्यानंतर होत नाही ते तोडून टाकणार म्हणजे ती पाणपोई सार्वजनिक विभागावर नागरिकांसाठी बांधली जाते. त्याला परवानगी ११ महिने असते. म्हणून स्थायी समितीमध्ये ठराव कुठेही काहीही करायचा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, पर्टीक्यूलर होल्डिंग्ज बांधण्यासाठी लाखो रु. चा खर्च येतो. एका वर्षाचा तो करणार नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पानपट्टे साहेब त्याचा खुलासा मी करतो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

त्यांचे म्हणणे बरोबर आहे. एक वर्षासाठी दिला पाहिजे. नाहीतर ती जागा पाणपोईच्या नावाने होईल आणि ते पैसे खावून टाकतील.

**शरद पाटील :-**

त्यांचे म्हणणे असे आहे की, तिथे जर अकरा महिन्यांचा कायदा आहे. तर ह्या होल्डिंग्जला अकरा महिन्याचा का कायदा नाही?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ठेका होल्डिंगचे आपले ३० लाख रु.ची डिमांड आहे. त्यांच्यामध्ये आपण साडे पंधरा लाख रु. वसूली केलेली आहे. दुसरा हफ्ता लगेच येईल. म्हणजे आपली १००टक्के वसूली होईल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब मी काम बोलते की आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये जेवढे होल्डिंग लावले किंवा जे बॅनर लागलेले आहे. तर ते आता काढणार की त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करणार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

काढणार आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पण तिथे आता पुन्हा लागणार आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी प्रभाग अधिकाऱ्यांना अधिकार देतो. आपण आपले एक वॉर्ड ठेवतो. अतिक्रमण विभागाचे कर्मचारी घेवून एक वार फिक्स करु या. जी तात्पुरती होल्डिंग्जला परवानगी दिली होती ना. ते आपण काढून टाकू. आणि ते सर्व अधिकार प्रभाग अधिकाऱ्यांना देणार.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब एक इंन्डिव्हयूजवल प्रश्न आहे. मिरारोडमध्ये मलायका म्हणून टी.व्ही शॉप आहे. बऱ्याच ठिकाणी त्यांच्या जाहिरातीचे बोर्ड लागतात तर ते आपल्याकडे टॅक्स भरतात का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

भरतात पे ॲण्ड पार्क चे भरतात पे ॲण्ड पार्क चे दोन साईड आहे. ह्याची डिमांड ४ लाख ७० हजार रु. आहे. आता त्याचे २ लाख रु. पर्यंत जमा झालेले आहे. ते महिन्याच्या महिने पैसे देतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पे ॲण्ड पार्क चा ठेका कधी दिला कोणाला दिला ते सांगा ना?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

एस. एस. इंटरप्रायजेस ला दिला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कधी दिला?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

पे ॲण्ड पार्क चा ठेका १७/८/२००२ साली वर्क ऑर्डर दिलेली आहे. त्याचे १७/८/२००८ ला संपते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पे ॲण्ड पार्क चा ठेका २००२ साली दिला प्रशासकीय ठराव आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

स्टॅण्डींग मध्ये विषय केलेला आहे. तसा ठराव झालेला आहे आणि त्याच्या निविदा आल्या होत्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

२००२ चा प्रशासकीय ठराव एकूण ५ भागामध्ये पे ॲण्ड पार्क ला दिला गेला एक साईड होवू शकली नाही. म्हणून त्याचा ठेका रद्द केला म्हणजे त्याची मागणी रद्द केली. राहिलेली ४ तर चारची मागणी किती आहे ते सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

एकाचे पाच वर्षासाठी चे २५ लाख रु. आहे आणि दुसऱ्या ग्रुपचे १० लाख रु. आहे आणि तिसऱ्या ग्रुपचे ९० हजार रु. आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

खतगांवकर साहेब पाच ठेका दिला त्याच्यातले एक जागा आपली नाही म्हणून गेला तर चार दिले तर पहिल्याचे किती?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

पहिल्याचे २५ लाख रु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दुसऱ्याचे किती?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

दुसऱ्याचे १० लाख रु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तिसऱ्याचे किती?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

तिसऱ्याचे ९० हजार रु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

चौथ्याचे किती?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

चौथ्याचे दिड लाख रु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा ठराव झाल्यानंतर ह्या ठरावानंतर पुन्हा एक ठराव झाला का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

झाला. आपण र्निलेखित केले. जर त्यांच्याकडून वसूल होवू शकत नाही..

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण तो ठराव वाचा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

ग्रुप नं. ३ अस्मिता प्लाझा ते लाईफ लाईन हॉस्पिटल आणि ग्रुप नं. ४ रेल्वे स्टेशन ते टी.एम.टी. बस स्टॉप ते सिंगापूर प्लाझा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा कधीचा ठराव आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

हा ठराव १८/१/०७ चा आहे. निर्लेखित केलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रशासकीय ठराव कधीचा आहे. आपण जो पाच लोकांना दिलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त साो.) :-**

एकूण चार ठेके दिले त्याच्यात एक ठेका २५ लाख रु. चा आहे. दुसरा ठेका १० लाख रु. चा आहे. तिसरा ठेका ९० हजार रु. चा आहे आणि चौथा ठेका १ लाख ५० हजार रु. चा आहे असे चार ठेके आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पाचवा ठेका झाला नाही ना.

**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.)साो.) :-**
पाचवा ठेका झाला नाही.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
तो र्निलिखित केला.
**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.)साो.) :-**
पाचव्या ठेक्याची अमाउंट सांगा.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**
पाचव्या ठेक्याची अमाउंट ५ लाख ५० हजार रु.
**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.)साो.) :-**
म्हणजे एकूण ४२.९० लाख रु. अशी वार्षिक मागणी होती.
**राजन लाकडे :-**
त्यांनी पाच वर्षाची मागणी सांगितली होती.
**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.)साो.) :-**
एकूण पाच वर्षाची मागणी ४२ लाख ९० हजार रु. होती.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
तुम्ही जे र्निलिखित केले ते कुठचे - कुठचे केले ?
**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.)साो.) :-**
किती रक्कम र्निलिखित केले.
**राजन लाकडे :-**
यातील जे होते ते बंद केले.
**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.)साो.) :-**
आता कोणत्या वर्षी अमंलबजावणी सुरु केली? आजच्या तारखेपर्यन्त एकुण किती मागणी होती? त्यापैकी किती वसूल झाली?किती र्निलिखित झाली?
**राजन लाकडे :-**
त्यातील मासिक १९ हजार ६४० रु. यायचे.
**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.)साो.) :-**
१९ हजार ६४० रु. म्हणजे गुणिले १२ बरोबर किती झाले?
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.):-**
१ लाख २७ हजार रु. झाले.
**राजन लाकडे :-**
दर महिन्याचे जे पैसे आहे. त्याला १२ महिने वार्षिक येते.
**बालाजी खतगावकर (मा.उपायुक्त (मु.)साो.) :-**
रक्कम काढा किती येते ?
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
तुम्ही सगळे मिक्स करु नका २५ लाख रु.ठेका पाच वर्षासाठी कायम आहे. ठेक्याची मुदत कधी संपते
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.):-**
२००८ साली मुदत संपते.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
हया ठेक्याचा आणखीन प्रस्ताव आलेला आहे. ते तुमच्याकडे आहे का?
**राजन लाकडे :-**
निर्लेखितला ठराव का?
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
नाही. वाढीव.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**
वाढीव नाही.
**ओमप्रकाश अग्रवाल :-**
हा ठराव २००२ साली प्रशासकीय ठराव झाला. पाच ठेके दिले गेले. पाच ठेक्यापैकी पाचवा ठेका आहे. हे त्याला आपली जागा नाही म्हणून त्याला रद्द केला. राहिलेले चार ठेके चार ठेक्यामध्ये हया चार ही ठेक्यांना काम करता आले नाही. त्यांना पे ॲन्ड पार्क ची वसुली करता आली नाही. म्हणून सहा महिने त्यांनी वसुली केली नाही. म्हणून ह्यांचे सहा महिने वाढवून द्यावी. असा ठराव झालेला आहे की नाही ते सांगा.
**राजन लाकडे :-**
झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तो कधी झालेला आहे?

**राजन लाकडे :-**

वर्क ऑर्डर प्रमाणे दि. १७/०८/२००२ त्याच्यानंतर पाच वर्षाची मुदत ही १७/०८/२००७. परंतु, प्रत्यक्ष चालू न झाल्यामुळे त्यामुळे त्यांना १४ एप्रिल पर्यंत दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही वाढीव कधी दिला? २००२ ला ठेका दिला. त्यांनी सहा महिने वसुली झाली नाही म्हणून त्याला वाढीव दिली. तर त्या वाढीवची झालेल्याची तारीख त्या ठरावाची तारीख द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

टॅली होते का बघा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टॅली करायची गोष्ट नाही. म्हणजे ते वसुल झाले नाही असे एका वर्षानंतर सांगतो त्यावेळेला आपण ठराव करतो. म्हणजे आपण......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

आपण हा ठेका पाच वर्षासाठी दिला. दिल्यानंतर त्या ठेकेदाराने सहा महिने जी कार्यवाहीची इम्प्लीमेन्ट करायला लागते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कार्यवाही नाही. त्याला आदेश दिलेले आहे. नंतर त्यांनी मागणी केली की.....

**मा. सभापती :-**

इम्प्लीमेंट झाले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

इम्प्लीमेंट करू शकले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग त्यांनी ठेका काढला कशाला?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सहा महिने वाढवीण्याचा कालावधी हा प्रशासकिय कालावधीचा निर्णय झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्थायी समितीमध्ये निर्णय झालेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

स्थायी ने निर्णय घेतलेला आहे. त्याची अजुन चर्चा करायची दुसरे काय अपेक्षित आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्थायी ने ह्यांच्याकरिता काय केले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

स्थायी ने काय केले ते आम्हाला माहित नाही. त्यावेळेची परिस्थिती......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यावेळच्या परिस्थितीमध्ये जो निर्णय घेतलेला आहे. सन्मा. सदस्य खान साहब, ६ महिने का पैसा उसे नही लेनेका? और ६ महिने का वाढ दो। बराबर है, उसने ६ महिने कमाई किया की नही. उसका किसीके पास रिपोर्ट नही है। उसने ६ महिने मे पैसा वसुल किया और मॅनेज किया और मुदत बढाके लिया।

**मा. सभापती :-**

उसको पे ॲन्ड पार्क का बोर्ड लगाके दिया।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, जेव्हा तुम्ही पे ॲन्ड पार्क चा टेंडर काढले. तुम्ही मोगम काढला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

६ महिने वाढ केली आहे ते चूक आहे असे तुम्हाला म्हणायचे आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हो. ते पैसे त्याच्याकडून का घेतले नाही. मला तेच म्हणायचे आहे की, त्याला कोणी व कुठल्या बेसवर दिले.

**मा. सभापती :-**

स्टँडींगने दिलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्टँडींगने दिलेली आहे. पण कुठल्या मुद्यावर दिलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सन्मा. सदस्यांनी आक्षेप घेतलेले आहे. ते मी मान्य करतो. आणि त्याचा ह्याठिकाणी खुलासा करतो. दि. १३/११/२००३ प्रकरण क्र. १६९ ठराव क्र. १४९ तत्कालीन स्थायी समितीने याबाबत पुर्ण चर्चा करून त्याबाबतची सत्य परिस्थिती जाणून घेवून यामध्ये जे पाच ठेके दिलेले होते आणि ते कार्यान्वीत का होवू शकले नाही. त्याचा ह्याठिकाणी निर्णय घेतलेला आहे. तो निर्णय मी आपल्याला थोडक्यात वाचून दाखवतो आणि त्याच्यामध्ये जे निर्णय सहा महिने वाढवून देण्याचे का घेतलेले आहे. त्याचे ग्राउन्स सुद्धा त्यांनी लिहिलेले आहे. म्हणजे कशाच्या आधारे तो निर्णय घेतलेला आहे. तो सुद्धा ह्याच्यामध्ये नमुद केलेला आहे. त्यामध्ये एक मुद्दा असा होता की, शांतीनगर भागामध्ये विकास कर्त्याने जागेबाबत हरकत घेतली होती. जिथे पे ॲन्ड पार्क करायचा होता. आणि त्यामुळे त्याला डीले झाला होता. म्हणून त्या ठेकेदाराची एका प्रकरणामध्ये चुक नव्हती. दुसऱ्या प्रकरणामध्ये रेल्वे फाटक ते अहमदाबाद हायवे ह्या रस्त्यांचे रुंदीकरणाचे काम चालू होते आणि तिथे सुद्धा पे ॲन्ड पार्क ची अडचण होती. त्या प्रकरणाची आपल्याला कल्पना असेल आणि त्यामुळे तिथे डिले त्यांना देण्यात आला होता. आणि ग्रुप नं. १,२,३,४ ह्या कालावधीत पाच महिने योजना वरील नमुद केलेल्या कारणामुळे सुरू करता आली नाही. म्हणून ती मुदतवाढ दिलेली आहे. पश्चिम रेल्वेच्या मालकीची जागेसाठी त्यांनी पत्र व्यवहार केला होता. पश्चिम रेल्वेकडून परवानगी मिळेल. असे दिसुन येत नाही. पश्चिम रेल्वे ठिकाणी पे ॲन्ड पार्क सुरू करण्यास मज्जाव करीत आहे. ही जागा रेल्वे प्रशासनाच्या मालकीची असल्याने महापालिकेत पे ॲन्ड पार्क वापरासाठी विरोध लक्षात घेता पाच लाख ५० हजार रू. रक्कम ठेकेदार जमा न केल्याने देवू शकत नाही. तरी सदरची रक्कम निर्लिखित करण्यास सभा मंजुरी देत आहे. आणि सुचक आहे श्री. चंद्रकांत वैती अनुमोदक आहे श्री. दिनेश नलावडे आणि सभापती साहेबांनी ठराव सर्वानुमते मंजुर केलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

चालू करता आला नाही. मग तो कोणामुळे चालू करता आला नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

साहेब, ही चर्चा अपेक्षित नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांनी ६ महिने पैसे वसुल केले आणि एका वर्षानंतर ही जावून काढू शकले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

एखादा ठरावावर प्रस्ताव देता येते त्या प्रस्तावावर एखाद्या अधिकाऱ्यांनी मागणी केली असे नाही. कोणत्याही विषयावर केव्हाही कधीही चर्चा करायची याला काही अर्थ नाही. आज तुम्ही एखादा निर्णय घेतला आणि दोन वर्षानंतर कोणीही येवून चर्चा करतो.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एका वर्षानंतर ठेका दिला आणि ह्यांनी माफी मागितली. माफ करा. ही चुकीची बाब आहे.

**मा. सभापती :-**

पे ॲन्ड पार्क का बाब है। गाडी किधर खडा करना है। वह जगह तो धुंडना चाहिए। मा. महासभेमध्ये बजेट तयार करते है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा ठराव चुकीचा झालेला आहे.

**मा. सभापती :-**

सर्व सन्मा. सदस्य, सदस्या अधिकारी वर्ग आजच्या मिटींगमध्ये उपस्थित राहिले व आजची सभा ही खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडली त्याबद्दल धन्यवाद. आणि आजची सभा संपली असे मी जाहिर करातो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.४० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**